सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात

### 'शिवनाथ आयुर्वेद'चा परवाना कायमचा रद्द, अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील जायगांव येथील डॉ मोहन पुरी यांच्या शिवनाथ आयुर्वेद प्रॉडक्ट कंपनी नावाच्या औषध निर्मिती कंपनीचा परवाना अन्न व औषध प्रशासनाने कायमचा रद्द केला आहे. डॉ. मोहन पुरी यांचे नाव संगमनेरजवळील वडगाव पान येथील कथित भोंदू राजेंद्र गडगेबाबा प्रकरणात सहआरोपी म्हणून समोर आले होते. गडगेबाबांच्या दरबारात बोगस औषधांचा पुरवठा केल्याचा आरोपही त्यांच्यावर करण्यात आला होता. नाशिक येथील अन्न व औषध प्रशासनाने जायगांव येथे छापा टाकून प्रत्यक्ष तपासणी केली. या तपासणीत औषध निर्मितीचे निकष पाळले जात नसल्याचे, उत्पादन प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचे आणि औषध व प्रशासन कायद्यातील अनेक नियमांचे उल्लंघन झाल्याचे समोर आले. अन्न व औषध प्रशासनाने परवाना प्रकरणी कंपनीची बाजू जाणून घेतली तसेच वस्तुस्थितीचा आढावा घेतला. नियमांचे गंभीर उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाल्यानंतर प्रशासनाने ३० जून २०२६ रोजी अंतरिम आदेश पारित केला. त्यानुसार शिवनाथ आयुर्वेद प्रॉडक्ट कंपनीचा औषध निर्मिती परवाना कायमचा रद्द करण्याचा निर्णय झाला आहे. दरम्यान, डॉ. मोहन पुरी हे भोंदू राजेंद्र गडगेबाबांचे निकटवर्तीय असून विविध भोंदूबाबांना औषधांचा पुरवठा करत असल्याचा संशयही तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. याबाबत अधिक तपास पोलिसांकडून सुरु आहे.

### MPSC औषध निरीक्षक परीक्षा वादाला नवे वळण; पेपरफुटीची तक्रारच बनावट असल्याचा दावा

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) औषध निरीक्षक पदाच्या भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या परीक्षेत गैरव्यवहार झाल्याची तक्रार समोर आल्यानंतर मोठी चर्चा सुरू झाली होती. मात्र, आता ही तक्रारच खोटी असल्याचा दावा समोर आला आहे. एमपीएससीमधील सूत्रांच्या माहितीनुसार, पुन्हा परीक्षा व्हावी या उद्देशाने तक्रारदाराने कथित बनाव रचल्याची शक्यता तपासली जात आहे. या प्रकरणामुळे राज्यात खळबळ उडाली होती. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर एमपीएससीने या तक्रारीची गंभीर दखल घेत चौकशी सुरू केली. मिळालेल्या माहितीनुसार, औषध निरीक्षक पदासाठीची लेखी परीक्षा 22 मार्च रोजी ऑफलाइन पद्धतीने घेण्यात आली होती. त्यानंतर 12 जून रोजी निकाल जाहीर झाला. पात्र उमेदवारांच्या मुलाखती 1 ते 21 जुलैदरम्यान पार पडल्या आणि 22 जुलै रोजी अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर 23 जुलै रोजी आयोगाला ई-मेलद्वारे पेपरफुटीची तक्रार प्राप्त झाली. आयोगाने तातडीने तक्रारदाराकडे पुरावे मागवले आणि तक्रारदार तसेच संबंधित उमेदवारांना चौकशीसाठी उपस्थित राहण्यास सांगितले. दरम्यान, या प्रकरणात नवे वळण आले असून तक्रारदाराने नंतर पाठवलेल्या आणखी एका ई-मेलमध्ये यापूर्वी केलेली तक्रार खोटी असल्याचे नमूद केल्याचा दावा केला जात आहे. पुन्हा परीक्षा घेण्यात यावी, या उद्देशाने पेपरफुटीची खोटी माहिती दिल्याचे त्याने कबूल केल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे.

# ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर

## चार ऑगस्टच्या यादीला ब्रेक; राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय

**मुंबई :** मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय राजवट संपून लवकरच लोकनियुक्त प्रतिनिधी येणार या आशेवर असलेल्यांच्या पदरी पुन्हा एकदा निराश आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने ४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीला ऐनवेळी स्थगिती दिल्याने आगामी ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. राज्यात सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेमुळे आयोगाने हा निर्णय घेतला असून, ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याच्या शक्यतांवर आता पाणी फिरले आहे.

यापूर्वीच्या नियोजित वेळापत्रकानुसार ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होऊन लगेचच निवडणुकीचे बिगुल वाजणार होते. या पार्श्वभूमीवर गावागावांत इच्छुक उमेदवारांनी बैठका, कॉर्नर सभा, मतदार संपर्क आणि पॅनेल बांधणीच्या हालचाली तीव्र केल्या होत्या. मात्र, मतदार याद्या दोषमुक्त आणि पारदर्शक करण्यासाठी सध्या राबवण्यात येत असलेली 'एसआयआर' मोहीम पूर्ण झाल्यानंतरच अद्ययावत विधानसभा मतदारसंघ निहाय यादी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वापरली जावी, अशी विनंती निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती.

आयोगाने ४ ऑगस्टच्या प्रसिद्धीला दिलेल्या स्थगितीमुळे सुमारे ७५४ ग्रामपंचायतींसह राज्यातील मुदत संपलेल्या सर्वच ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया काही काळासाठी पुढे ढकलली गेली आहे. मात्र, या निर्णयामुळे मतदार यादीतील मयत, दुबार, स्थलांतरित आणि बोगस मतदारांची नावे वगळून पूर्णपणे अद्ययावत व पारदर्शक यादी हाती येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे ग्रामीण भागातील राजकीय गणिते आणि मतांची जुळवाजुळव पूर्णपणे बदलणार आहे.

### नव्या वेळापत्रकाची प्रतीक्षा

अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज स्वीकारणे, छाननी, चिन्ह वाटप आणि प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडणार होती. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी विकासकामांच्या भूमिपूजनांचा धडाका सुरू असतानाच आता या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय वातावरण पुन्हा 'वेट अँड वॉच' मोडवर गेले आहे. अतिवृष्टी आणि सणासुदीच्या काळासोबतच आता 'एसआयआर' मोहिमेची भर पडल्याने, नवीन अद्ययावत मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच राज्य निवडणूक आयोग निवडणुकांचे नवे वेळापत्रक जाहीर करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी 22 हजार 425 कोटींचा विकास आराखडा

## मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीची मंजुरी

**मुंबई :** आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य आयोजनासाठी आणि पायाभूत सुविधांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने २२ हजार ४२५ कोटी ३९ लाख रुपयांच्या विकास आराखड्याला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. यासंदर्भातील माहिती केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी सोमवारी लोकसभेत एका लेखी प्रश्नाच्या उत्तरात दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या उच्चस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत या आराखड्याला अंतिम मान्यता देण्यात आल्याचे राज्य सरकारने केंद्र सरकारला कळवले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन, विविध विभागांमधील समन्वय आणि धोरणात्मक निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी राज्य शासनाने विशेष त्रिस्तरीय समिती रचना अमलात आणली आहे. यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ४० सदस्यांची उच्चस्तरीय शिखर समिती गठीत करण्यात आली असून, स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून नाशिकच्या खासदारांचाही यात समावेश करण्यात आला आहे. याशिवाय आयोजनाच्या रोजच्या समन्वयासाठी एक कार्यकारी समिती आणि धोरणात्मक निर्णयांना गती देण्यासाठी कुंभमेळा मंत्री समिती कार्यरत करण्यात आली आहे.

# बिहार बंद आंदोलनादरम्यान गोळीबार, AK-47 वापरल्याप्रकरणी पोलीस निलंबित

बिहारमध्ये पेपरफुटी प्रकरणासह (Bihar) विविध मागण्यांसाठी विद्यार्थी संघटनांनी पुकारलेल्या 'बिहार बंद' (Bihar Band) आंदोलनादरम्यान सिवान जिल्ह्यात हिंसक घटना घडल्याचे समोर आले आहे. आंदोलनादरम्यान एका पोलिसाने AK-47 रायफलमधून गोळीबार केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधित पोलिसाला निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 25 जुलै रोजी सिवान येथील गांधी मैदान परिसरात विविध विद्यार्थी संघटनांनी आंदोलन केले होते. आंदोलनादरम्यान परिस्थिती तणावपूर्ण बनली आणि जेपी चौक परिसरात आंदोलनकर्ते व पोलिसांमध्ये संघर्ष झाला. यावेळी जमावाकडून दगडफेक करण्यात आल्याचे सांगितले जात असून, त्यात सिवानचे पोलीस अधीक्षक पी. झा जखमी झाले. त्यांच्या पायाला दुखापत झाल्याची माहिती आहे.

# विद्यार्थी वाहतूकसाठी नवी नियमावली;चालकांवर होणार कठोर कारवाई

**मुंबई :** राज्य शासनाने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियम,२०२६ अंतर्गत शालेय बस आणि व्हॅनसाठी नवीन नियम लागू केले आहेत.१६ जुलै रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या या नियमांमुळे विद्यार्थी वाहतूक अधिक सुरक्षित,शिस्तबद्ध आणि पारदर्शक होणार आहे.प्रथमच शालेय वाहतुकीच्या भाडे निर्धारणाचे अधिकार प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांकडे (RTO)देण्यात आले असून,पालकांची आर्थिक फसवणूक रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

नव्या नियमांनुसार प्रत्येक शालेय वाहनात सीसीटीव्ही(CCTV),जीपीएस(GPS),सीट बेल्ट,पॅनिक बटण,डिजिटल(DIGITAL) हजेरी प्रणाली आणि व्हेईकल ट्रॅकिंग यंत्रणा अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना मोबाईल(MOBILE) ॲपद्वारे मुलांच्या प्रवासावर लक्ष ठेवता येणार आहे.तसेच सीसीटीव्ही फुटेज ३० दिवस जतन करणे बंधनकारक असेल.वाहनचालक आणि मदतनिसांसाठी पोलिस पडताळणी,वैद्यकीय प्रमाणपत्र आणि शारीरिक तंदुरुस्तीची अटही लागू करण्यात आली आहे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही शासनाने दिला आहे.

# धाकटी पंढरपूर जिल्हा परिषदेच्या हजार कर्मचाऱ्यांनी केले चकाचक

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीनिमित्त धाकटी पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यासह मराठवाड्यातून लाखो भाविकांनी गर्दी केली होती. भाविकांसाठी विविध ठिकाणी अन्नदानाचे स्टॉल उभारण्यात आल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, ओला व सुका कचरा साचला होता. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम. यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी धाकटी पंढरपूर येथे भव्य 'स्वच्छता सेवा अभियान' राबविण्यात आले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके यांनी या मोहिमेचे नियोजन केले. मंदिर परिसरासह पंढरपूर, रांजणगाव शेणपुंजी, तिसगाव, पाटोदा आणि वळदगाव परिसरातील १७ ठिकाणी स्वच्छता पथके तैनात करण्यात आली. प्रत्येक ठिकाणी विभागप्रमुख व गटविकास अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली कर्मचाऱ्यांनी रस्त्यांच्या दुतर्फा पसरलेला कचरा संकलित करून परिसर स्वच्छ केला.

या अभियानात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरावरील सुमारे एक हजार अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. शिक्षक, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, आरोग्य



सेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि विविध विभागांचे कर्मचारी यांनी श्रमदान करत परिसर चकाचक केला.

तीन तास चाललेल्या या मोहिमेत दोन ट्रॅक्टरभर ओला, सुका व प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. ग्रामपंचायत पंढरपूरसह वाळूज व वळदगाव ग्रामपंचायतींनी ट्रॅक्टर व घंटागाड्यांची व्यवस्था केली. संकलित कचरा पुढील प्रक्रियेसाठी महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्यात आला.

स्वच्छता मोहिमेत सहभागी कर्मचाऱ्यांनी, "आषाढी एकादशीच्या दिवशी प्रचंड गर्दीमुळे विठ्ठलाचे दर्शन घेता आले नव्हते. मात्र आज स्वच्छता सेवा करताना प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन झाल्याची अनुभूती मिळाली," अशी भावना व्यक्त केली.

या अभियानात पंढरपूरच्या सरपंच वैशाली राऊत, उपसरपंच रेश्मा शेख, ग्रामविकास अधिकारी हरीश आंधळे, माजी सरपंच अख्तर शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) चंद्रहार ढोकणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, जिल्हा कृषी अधिकारी प्रकाश पाटील, उपायुक्त (पशुसंवर्धन) नानासाहेब कदम, कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेळके, गटविकास अधिकारी सुहास वाघचौरे, शिवाजी साळुंके, ज्ञानदेव जायभाये यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायत प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# 'रॉ' अधिकारी असल्याचे भासवून लाखोंची खंडणी मागणारा जेरबंद

**गुजरात :** गुजरातमधील(GUJRAT)राजकोट येथील एका धान्य व्यापाऱ्याचे बँक खाते ऑनलाईन व्यवहारानंतर गोठवून,स्वतःला 'रॉ'(RAW) अधिकारी असल्याचे भासवत खाते सुरू करून देण्यासाठी सव्वा चार लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या परेश प्रवीण कोठारी(वय ४२,रा.सातारा रस्ता,पुणे)याला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने अटक केली.या प्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या खात्यात वेगवेगळ्या खात्यांतून चार हजार रुपये जमा झाल्यानंतर बँक खाते गोठविण्यात आले.चौकशीत हे व्यवहार पुण्यातील खात्यांतून झाल्याचे समोर आले. त्यानंतर संशयिताने व्हॉट्सॲप कॉलद्वारे(WHATSAPPCALL) संपर्क साधत स्वतःला 'रॉ'अधिकारी असल्याचे सांगितले आणि खाते सुरू करण्यासाठी सुरुवातीला पाच लाख,नंतर तडजोडीनंतर सव्वा चार लाख रुपयांची मागणी केली.पैसे न दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील,अशी धमकीही दिली. तक्रारदाराने वकिलांच्या सल्ल्याने गुन्हे शाखेकडे तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला.सातारा रस्त्यावरील पंचमी चौक परिसरात खंडणीची रक्कम स्वीकारण्यासाठी आलेल्या परेश कोठारीला रंगेहात अटक करण्यात आली असून पुढील तपास पर्वती पोलीस करत आहेत.




# अभाविप देवगिरी प्रदेश कार्यालयाचे भूमिपूजन उत्साहात; राष्ट्रपुनर्निर्माणाच्या कार्याला नवे बळ

## हे कार्यालय कार्यकर्त्यांच्या ऊर्जेचे आणि नेतृत्व घडविण्याचे प्रेरणाकेंद्र ठरेल : अतुल लिमये

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) देवगिरी प्रदेशाच्या नव्या कार्यालयाचे भूमिपूजन सोमवारी छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह मा. श्री. अतुल लिमये यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थी चळवळीला अधिक सक्षम दिशा देणे, कार्यकर्त्यांचे संघटन, प्रशिक्षण, संवाद आणि राष्ट्रपुनर्निर्माणाच्या कार्याला गती देण्याच्या उद्देशाने उभारण्यात येणाऱ्या या कार्यालयाच्या भूमिपूजन सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाला तौरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पुणेचे व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. भरत गिते, अभाविपचे राष्ट्रीय संघटनमंत्री मा. श्री. आशिष चौहान, श्री अष्टविनायक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. राहुल पगारिया, सचिव श्री. मनीष पाटील, अभाविप देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा. डॉ. सुरेश मुंढे, प्रदेशमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे यांच्यासह अनेक पदाधिकारी, पूर्व कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अतुल लिमये म्हणाले, "अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य केवळ विद्यार्थ्यांना संघटित करणे नसून त्यांना राष्ट्रभक्तीच्या विचाराशी जोडणे आहे. आजच्या वेगवान काळात विद्यार्थ्यांना योग्य दिशा, वैचारिक स्पष्टता आणि राष्ट्रहिताचे ध्येय देण्याचे महत्त्वाचे कार्य हे कार्यालय करेल. हे केवळ इमारत नसून राष्ट्रनिष्ठ, चारित्र्यसंपन्न आणि समाजाभिमुख नेतृत्व घडविणारे प्रेरणाकेंद्र ठरेल."


भरत गिते यांनी उद्योग, तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात भारताला सक्षम बनविण्यासाठी गुणवत्तापूर्ण व राष्ट्रहिताची जाणीव असलेले नेतृत्व आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय दायित्वाची भावना रुजवत समाजाभिमुख नेतृत्व घडवत असून देवगिरी प्रदेशाचे नवे कार्यालय या प्रक्रियेला अधिक बळ देईल, असे त्यांनी नमूद केले.

राष्ट्रीय संघटनमंत्री आशिष चौहान यांनी अभाविपच्या ७७ वर्षांच्या राष्ट्रनिष्ठ प्रवासाचा आढावा घेत विद्यार्थी परिषद ही केवळ विद्यार्थी संघटना नसून राष्ट्रपुनर्निर्माणाची व्यापक चळवळ असल्याचे सांगितले. कार्यकर्त्यांचे वैचारिक, संघटनात्मक आणि सामाजिक नेतृत्व घडविण्यात कार्यालयाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात वैदिक मंत्रोच्चारात भूमिपूजन विधीने झाली. या प्रसंगी कॅबिनेट मंत्री अतुल सावे, संजय सावकारे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार अनुराधा चव्हाण, सुहास शिरसाठ, महापौर समीर राजूरकर, शहरातील उद्योजक, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदेशमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## प्रा. शुभांगी आंबले यांना पीएच.डी पदवी प्रदान



**माजलगाव प्रतिनिधी :** येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्रा. शुभांगी राजाभाऊ आंबले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत वाणिज्य विषयात पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा. शुभांगी राजाभाऊ आंबले यांनी प्रोफेसर डॉ. पी. एन.औटे यांच्या मार्गदर्शनाखाली "ऍन ॲनालिटिकल स्टडी ऑफ सप्लाय चेन मॅनेजमेंट ऑफ लार्ज फार्मास्युटिकल इंडस्ट्रीज ऑफ महाराष्ट्र" या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता.

प्रा.शुभांगी आंमले यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ.सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.बी.आर.डक, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी.एल. चव्हाण, प्र.प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे,उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.सचिन रुद्रवार, डॉ. बिलास काळे, डॉ. नितीन ढवळे यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल च्या चिमुकल्यांनी वारकरी दिंडीच्या माध्यमातून दिला सामाजिक संदेश

### नाविन्य पूर्ण वारकरी दिंडी उत्साहात संपन्न

केज/प्रतिनिधी

दिनांक 25 जुलै 2026 रोजी वार - शनिवार रोजी इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

विठ्ठल रूक्मिणीच्या मुर्ती असलेली पालखी तुळशी वृंदावन घेतलेल्या आमच्या बालिका ढोल ताशांच्या व अभंगाच्या तालावर डोलणारे Nursery, jLKG, UKG छोटे वारकरी तालात टाळ वाजवत दिंडीत सहभागी झाले होते. तसेच सर्व विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळ्याचा आनंद ओसंडून वाहत होता.

शाळेतून निघालेली दिंडी "ज्ञानोबा माऊली तुकाराम" च्या जयघोषात व भगव्या पताका हातात घेऊन गावांमध्ये पोहोचली.हनुमान मंदिराच्या समोर शाळेतील मधील विद्यार्थीनींनी "विठ्ठल विठ्ठल विठ्ठला हरी ओम विठ्ठला" या गीतावर नृत्य सादर केले.

सर्व विद्यार्थ्यांनी बाजूने रिंगण केले होते.तसेच इयत्ता तिसरी, चौथी व पाचवीतील विद्यार्थ्यांनी "माऊली माऊली माऊली" या गाण्यावर स्वस्तिक बनवले व पंढरपूर मधिल रिंगण सोहळ्याचे दर्शन ग्रामस्थांना घडवले. यानंतर इयत्ता तिसरी मधील विद्यार्थ्यांनी फुगडी सादर केली तसेच विद्यार्थीनींनी अभंग देखिल सादर केले.

छोटे विठ्ठल - रूक्मिणी, मोठे विठ्ठल -रुक्मिणी, संत तुकाराम, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत जनाबाई,संत कान्होपात्रा, संत सखू इ. वेशभूषेत आलेंले विद्यार्थी हुबेहूब दिसत होते.

## जि.प.प्राथमिक शाळा पारधीवस्ती (बोबडेवाडी) च्या उमेश पवारचे यश

केज /प्रतिनिधी


महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प. प्राथमिक शाळा पारधीवस्ती येथील विद्यार्थी उमेश चंद्रकांत पवार याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

या परीक्षेत उमेश पवार याने एकूण ३०० पैकी २०० गुण (६६.६७ टक्के) मिळवून शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळवली आहे. त्याने पेपर क्र. १ (भाषा व गणित) मध्ये ९२ गुण तर पेपर क्र. २ (बुद्धिमत्ता व इंग्रजी) मध्ये १०८ गुण प्राप्त केले.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री.किशोर भालेराव, शिक्षिका श्रीम. वंदना गुट्टे ,पालक,शाळा व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांकडून अभिनंदन केले जात आहे. त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

मार्गदर्शक शिक्षकांच्या योग्य नियोजनामुळे व विद्यार्थ्याच्या मेहनतीमुळे हे यश मिळाले असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त श्री गुरु पादुका मठात विविध कार्यक्रमांचे आयोजन



**अंबाजोगाई :** आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये गुरू व गुरुपौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळेच या दिवशी गुरु व शिष्याचे नाते अजून घट्ट होण्यासाठी गुरुपौर्णिमा ही अतिशय मनोभावे साजरी केली जाते. बुधवार दि २९ रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी अंबाजोगाई शहरालगत असलेल्या चनई येथील श्री गुरु पादुका मठात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मठाचे मठाधीश परमपूज्य सर्वज्ञेश्वर स्वामी महाराज यांनी दिली आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवसाची सुरुवात मठामध्ये सकाळी ७ वाजता सर्वप्रथम भगवान केदारनाथ महाराजांच्या अभिषेकाने होईल. त्यानंतर सकाळी ८ वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांचा षोडशोपचार अभिषेक करण्यात येणार आहे. सकाळी ११ ते १२ या वेळेत भक्तांकडून "श्री स्वामी समर्थ जय जय श्री स्वामी समर्थ, दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या महामंत्राचा सामूहिक जप व भजन होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता महाआरती व महाप्रसादाचे आयोजन केले आहे. गुरुपौर्णिमेच्या सायंकाळी ६ वाजता महाआरतीनंतर मठातून स्वामी समर्थांचा पालखी सोहळा निघणार असल्याचे मठाधिपती यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे.

या पवित्र सेवांचा जास्तीत जास्त भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मठाधिश सर्वज्ञेश्वर स्वामी महाराज, प्रवीण बासटवार, श्रद्धा भास्करे, संगीता सौदागर, राजपाल काकडे, दिपक मोरे,अनिकेत पवार, पुष्पलता कराड यांच्यासह सिद्धिविनायक वसाहती मधील सर्व रहिवासी व समस्त स्वामीभक्त परिवाराने केले आहे.

## वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त वडवणीत भव्य बंजारा समाज मेळावा

**बीड, 27 जुलै :** वडवणी येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य बंजारा समाज मेळाव्यात राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी उपस्थित राहून समाजबांधवांशी संवाद साधला.

यावेळी मंत्री राठोड यांनी स्वर्गीय वसंतराव नाईक यांचे लोकहित, शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासासाठीचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला नवी दिशा मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

## आत्मविश्वास, संयम आणि संघटन कौशल्य या गुणावर उत्तम नेतृत्व बहरते - डॉ यशवंत राजेभोसले

### विद्यार्थी नेतृत्व गुण विकास शिबीराचे उदघाटन संपन्न




माजलगाव- येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी नेतृत्व गुण विकास शिबिराच्या उदघाटन प्रसंगी डॉ यशवंत राजेभोसले बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, नेतृत्व करण्यासाठी वयाची मर्यादा नसते उत्तम नेतृत्व निर्माणासाठी आत्मविश्वास, संघटन कौशल्य, संयम आणि शिस्त हे सर्व गुण शालेय जीवनात अशा शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जातात. यावेळी त्यांनी मास्टर ब्लास्टर, भारतरत्न सचिन तेंडुलकर, शास्त्रज्ञ थॉमस एडिसन यांच्या जीवनातील प्रसंगाचा संदर्भ देऊन नेतृत्व गुणाविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

या शिबीराचे उदघाटन दीपप्रज्वलन, माता सरस्वती व पंच परिवर्तन प्रतिमेचे पूजन करून झाले. या सत्राचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह ॲड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शिबीर निरीक्षक श्रीकांत देशपांडे, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते.

या सत्राचे अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी नेतृत्वासाठी आवश्यक असणारे गुण आत्मसात केले पाहिजे. आज आपल्या विद्यालयातील माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत नेतृत्व करत आहे. प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी सांगितले की, नेतृत्व गुण हे जन्मतः नसतात तर ते आत्मसात करून नेतृत्व साकारले जाते हे सांगताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाचे उदाहरण दिले. या सत्राचे सुत्रसंचालन कु. अपूर्वा गोरे हिने केले तर आभार अभ्यास पूरक मंडळ सह प्रमुख रोहित खिंडरे यांनी केले. यावेळी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख प्रभाकर बनसोडे, सर्व शिक्षक उपस्थित होते.

## रसिक फाउंडेशनच्या आषाढी मोहोत्सवात डॉ.आशिष रानडेंची 'संतवाणी'



बीड/वार्ताहर ; रूआषाढी एकादशी निमित्ताने रसिक फाउंडेशन आणि राजयोग फाउंडेशनने आयोजित केलेल्या आषाढ मोहोत्सवात नाशिक येथील डॉ.आशिष रानडे यांनी भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांनी अजरामर केलेल्या संतांच्या भक्तीरचना सादर करून उपस्थित रसिक श्रोत्यांनी पंढरीची स्वरमय वारी घडवली.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सौ.विनया राजीव हसेगावकर यांनी तर सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन सौ.प्रज्ञा हेमंत बडवे यांनी केले.नगरसेवक तथा राजयोग फाउंडेशनचे प्रमुख शुभम धुत यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. आपल्या गायनाचा प्रारंभ डॉ.आशिष रानडे यांनी 'जय जय रामकृष्ण हरी' चा गजर करून केला आणि मग लागोपाठ 'राजस सुकुमार मदनाचा पुतळा ','काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल', 'इंद्रायणी काठी देवाची आळंदी', 'माझे माहेर पंढरी आहे भिवरेच्या तीरी', ' माझा भाव तुझे चरणी ', ' तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल', ' बाजे मुरलिया बाजे रे ', ' भाग्यदा लक्ष्मी बारंबा',' ज्ञानीयांचा राजा गुरू महाराव ', या रचना सादर करून 'जो भजे हरी को सदा वो ही परम पद पावेगा ' या भैरवी रागातील भक्तीरचनेने आपल्या रंगलेल्या बहारदार गायनाची सांगता केली. डॉ.आशिष रानडे यांना हार्मोनियमवर सौ. दिव्या रानडे ,तबल्यावर सौरभ क्षीरसागर,पाखावजवर आसाराम साबळे, टाळावर सिद्धार्थ निकम यांनी आणि गायन साथ अथर्व ठाकूर यांनी केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रसिक फाउंडेशनचे

अध्यक्ष महेशराव वाघमारे,सचिव दीपक कर्नावट ,उपाध्यक्ष मिलिंद सुंदर ,कोषाध्यक्ष विकास उमापूरकर, कार्यकारणी संचालक संस्थापक अध्यक्ष अमर डागा,डॉअनुराग पांगरिकर,डॉ प्रसन्न कुलकर्णी,ईश्वर मुथा,सीए गोपाल मालू,प्रदीप मुळे,वाय जनार्धन राव,राम मोटवाणी,डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हांकर, विष्णू बियाणी, सुदर्शन धुतेकर, रसिक मानद संचालक डॉ. अनिल बारकुल,वासवदत्ता हसेगावकर, प्रज्ञा बडवे,प्रा. दीपक मुळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किल्ले धारूर येथे कारगिल विजय दिवसानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली सभा

### माजी सैनिक संघटनेच्या वतीने देशभक्तिपूर्ण कार्यक्रम आयोजित: वीर जवानांना अभिवादन



**किल्ले धारूर, । प्रतिनिधी:** कारगिल विजय दिवसानिमित्त किल्ले धारूर येथे माजी सैनिक संघटनेच्या वतीने देशभक्तिपूर्ण वातावरणात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या कारगिल युद्धातील वीर जवानांच्या शौर्याचे स्मरण करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमास नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, धारूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र घुगे, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी सय्यद शाकेर, गटनेते नितीन शिनगारे, शहराध्यक्ष डॉ. मयूर सावंत, प्रा. नितीन शुक्ला, सामाजिक कार्यकर्ते संदीप शिनगारे, सूर्यकांत जगताप माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय शिनगारे यांच्यासह माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, सदस्य आणि अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या अदम्य शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रसेवेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. देशाच्या संरक्षणासाठी सैनिकांनी दिलेले सर्वोच्च बलिदान हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असून त्यांच्या त्यागामुळेच देशाची अखंडता आणि सुरक्षितता अबाधित असल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात उपस्थितांनी वीर जवानांच्या स्मृतींना अभिवादन केले. राष्ट्रासाठी बलिदान देणाऱ्या सैनिकांचे स्मरण आणि त्यांच्या कुटुंबियांचा सन्मान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले.

कारगिल विजय दिवसानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. वीर जवानांच्या शौर्यगाथा आणि त्यांच्या बलिदानाची स्मृती अजूनही प्रत्येक भारतीयाच्या हृदयात जागृत असल्याचे या कार्यक्रमातून दिसून आले.

## वाहतूक नियमभंग करणार्या रिक्षाचालकांना जिल्हा वाहतूक शाखेचा दणका; 31 रिक्षा जप्त

### जिल्हा न्यायालयात देखील कारवाई

**बीड । प्रतिनिधी :** शहरातील वाढती वाहतूक कोंडी, बेशिस्त वाहनचालक आणि वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन करणार्या रिक्षाचालकांविरोधात जिल्हा वाहतूक शाखेने धडक कारवाईचा बडगा उगारला आहे. विशेष तपासणी मोहिमेदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्या 31 रिक्षांवर कारवाई करत त्या जप्त करण्यात आल्या. तसेच जिल्हा न्यायालयामध्ये देखील 35 अस्ताव्यस्त वाहन उभे केलेल्या वाहनधारकांवर कारवाई करुन त्यांच्याकडून 30 हजारांचा दंड वसूल करण्यात आला.या कारवाईमुळे नियमभंग करणार्या वाहनचालकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. ही मोहीम पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या नेतृत्वाखाली तसेच अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर आणि पोलीस उपनिरीक्षक विष्णु जायभाये, पोलीस हवालदार मनोज जायभाये, ज्ञानेश्वर जाधव, फुलचंद जाधव, त्रिंबक कुडके, राजाभाऊ तांदळे, पोलीस हवालदार गणेश तळेकर, आदिनाथ मुंडे, सखाराम घोलप, पोलीस अंमलदार संतोष मोरे, राहुल घाडगे, पोलीस चालक संतोष हारके, दत्ता कदम पथकाने शहरातील विविध चौक, मुख्य रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी अचानक तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणार्या रिक्षाचालकांवर कठोर कारवाई केली.

कारवाईदरम्यान वाहनांचे परवाने, नोंदणी कागदपत्रे, विमा, फिटनेस प्रमाणपत्र, प्रदुषण प्रमाणपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स तसेच वाहतूक नियमांचे पालन यांची सखोल पडताळणी करण्यात आली. आवश्यक कागदपत्रांचा अभाव, नियमांचे उल्लंघन आणि बेशिस्त वाहनचालकांना कोणतीही सवलत न देता संबंधित रिक्षा जप्त केल्या.

## प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा ज्ञानबोधिनी विद्यालयात गौरव

**परळी वैजनाथ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालय, परळी वैजनाथच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेत विशेष गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

यामध्ये चि. अजिंक्य अश्विन मोगरकर, चि. विनायक सचिन भुतडा, कु. ओवी सचिन फुटाणे आणि चि. रमण विजय तोष्णीवाल यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे सचिव तथा ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर व कंपास पेटी देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी परीक्षा विभाग प्रमुख गोपनपाळे सर, जाधव सर तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक-शिक्षिकांचे आणि विद्यार्थ्यांच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचेही कौतुक करण्यात आले. भविष्यात अधिक परिश्रम, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर उच्च यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या असून, इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणा मिळणार आहे.

## नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे आज आषाढी वारी साजरी...

**बीड :** आषाढी एकादशीनिमित्त आज गोकुळ शिशु वाटिकेची वारकरी दिंडी आणि नानाजी देशमुख विद्या मंदिराची वृक्षदिंडी घेण्यात आली.. सर्वप्रथम पांडुरंगाच्या फोटोची पूजा आणि आरती करण्यात आली यावेळी डॉ. सीमाताई जोशी, गंगाधर जी.देशमुख सर, सुनंदा ताई कुलकर्णी, मधुराताई कुलकर्णी,वजुरकर ताई , नानाजी देशमुख विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका अर्चना ताई मोराळे आणि शिशु वाटिका प्रमुख आरती ताई जोशी उपस्थित होते.. सर्वप्रथम विद्यार्थ्यांची दिंडी काढण्यात आली यामध्ये इयत्ता पहिलीच्या विद्यार्थांनी पाऊली व इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी रिंगण केले आणि फुगड्या खेळल्या. त्यानंतर विठ्ठल नामाचा जयघोष करत दिंडी मंदिराच्या दिशेने निघाली. यावेळी विठ्ठल, रुक्मिणी, संत नामदेव , संत तुकाराम ,संत एकनाथ, संत मुक्ताबाई ,संत बहिणाबाई, संत ज्ञानेश्वर वेशभूषा करून विद्यार्थी आले होते. वृक्षदिंडी मध्ये विद्यार्थ्यांनी झाडे लावा झाडे वाचवा, प्लास्टिक बंदी आणि स्वच्छतेच्या घोषणा दिल्या. विठू नामाचा गजर करत करत ही दिंडी मंदिराकडे गेली. तिथे आरती झाल्यानंतर विघ्नहर्ता मित्र मंडळ यांच्याकडून विद्यार्थ्यांना खाऊ देण्यात आला. दिंडीचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला. या दिंडीसाठी जनशिक्षण संस्थांचे सर्व कार्यकर्ते , ॲड. अर्चनाताई तुंगार यांचे मार्गदर्शन व शिक्षिका , शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## पंढरपूरच्या वारीत थकलेल्या वारकऱ्यांना धारूरच्या मातीवर मिळाले आश्रय — 15 वर्षांची निस्वार्थ सेवा, विठ्ठलभक्तांचे समर्पण!

### 'प्रसिद्धीचा मोह न साधता वारकऱ्यांची सेवा करणारे धारूरचे विठ्ठलभक्त प्रेरणादायी — आयुष्मान भारत प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते आरोग्य शिबिराचा शुभारंभ'



**किल्ले धारूर (प्रतिनिधी) :** आषाढी एकादशीला पंढरपूरला जाणारे वारकरी मार्ग चालत जातात, तेव्हा त्यांच्या पावलांनी मार्ग दुमडला जातो. पण वारी आटोपून परतताना तेच वारकरी थकलेले, हाललेले असतात. अशा या थकलेल्या वारकऱ्यांना आपल्याच मातीवर, आपल्याच लोकांकडून मिळणारी सेवा — ही खरोखरच आपलेपणाची गोष्ट आहे. किल्ले धारूर शहरातून पालखी मार्ग जात असल्याने, आषाढी वारीहून परतणाऱ्या वारकऱ्यांसाठी गेल्या पंधरा वर्षांपासून काही विठ्ठलभक्तांच्या पुढाकारातून भोजन व्यवस्था व मोफत आरोग्य तपासणीचा समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. ही योजना नाही, हे शासनाचे आदेश नाही — तर भावनेतून जन्मलेली सेवा आहे.

हजारो वारकऱ्यांची सेवा — भोजन आणि आरोग्य तपासणी एकाच ठिकाणी

यंदाही हजारो वारकऱ्यांची सेवा करण्याच्या उद्देशाने भोजन व्यवस्था तसेच आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा शुभारंभ आयुष्मान भारतचे प्रमुख मा. डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते करण्यात आला. वारकऱ्यांना भोजन, आरोग्य तपासणी आणि आवश्यक वैद्यकीय सल्ला — हे सर्व एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरत असून, विठ्ठलभक्तांच्या या निस्वार्थ सेवाकार्याचे परिसरातून सर्वत्र कौतुक होत आहे.

डॉ. शेटे यांचे कौतुक — 'प्रसिद्धीपासून दूर, निस्वार्थ सेवेची वाट'

यावेळी डॉ. शेटे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना ठामपणे म्हटले,

"प्रसिद्धीपासून दूर राहून निस्वार्थ भावनेने वारकऱ्यांची सेवा करणारे किल्ले धारूरचे विठ्ठलभक्त समाजासाठी प्रेरणादायी आहेत. अशा सेवाभावी कार्याची माहिती समाजातील अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे."

हे वाक्य केवळ एका प्रमुखाचे कौतुक नाही — ते धारूरच्या विठ्ठलभक्तांच्या निस्वार्थ सेवेची जाणीव समाजाला करून देणारी घंटा आहे. प्रसिद्धीचा मोह न साधता, वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील थकवा घालवण्यासाठी स्वतःला झोकून देणारे हे विठ्ठलभक्त खरोखरच समाजासाठी प्रेरणादायी आहेत.

१५ वर्षांची अखंड वाटचाल — श्रद्धेची अविरत ज्योत

गेल्या १५ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. वर्षानुवर्षे बदलत गेली, परिस्थिती बदलत गेली, पण धारूरच्या विठ्ठलभक्तांची सेवाभावना अबाधित राहिली. आषाढी वारीच्या प्रत्येक वर्षात वारकऱ्यांच्या पावलांनी गजबजलेला पालखी मार्ग आणि त्या मार्गावर निस्वार्थ सेवेसाठी उभे राहणारे विठ्ठलभक्त — हे चित्र आता धारूरची ओळख बनले आहे.

ज्या वारकऱ्यांच्या पावलांमुळे पंढरपूरची वारी जगभर ओळखली जाते, त्याच वारकऱ्यांची थकवलेली पावले धारूरच्या मातीवर आश्रय थांबतात — आणि इथेच विठ्ठलभक्त त्यांच्या सेवेत उभे असतात. ही श्रद्धा आहे, हे समर्पण आहे, आणि हाच धारूरचा आत्मा आहे.

सेवा ही श्रद्धा आहे — विठ्ठलभक्तांचे निस्वार्थ समर्पण

विठ्ठलभक्तांची ही सेवा श्रद्धेची, निस्वार्थाची आणि समर्पणाची आहे — यात शंका नाही. धारूरच्या या विठ्ठलभक्तांनी दाखवलेला हा मार्ग आता संपूर्ण पालखी मार्गासाठी एक आदर्श नमुना बनला आहे. प्रसिद्धीपासून दूर, स्वतःच्या घरादाराच्या सोईसुविधा बाजूला ठेवून, केवळ विठ्ठलाच्या भक्तांच्या सेवेसाठी वर्षानुवर्षे स्वतःला झोकून देणारे हे विठ्ठलभक्त खरोखरच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य अंग आहेत.

वारकरी हा केवळ एक भाविक नाही — तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. आणि धारूरच्या विठ्ठलभक्तांनी या वारकऱ्यांच्या सेवेसाठी दाखवलेली वाट — ती श्रद्धेची, प्रेमाची आणि निस्वार्थाची वाट आहे.

धारूरच्या विठ्ठलभक्तांच्या या निस्वार्थ सेवाकार्याचे परिसरातून सर्वत्र कौतुक होत आहे. गेल्या १५ वर्षांच्या या प्रवासात विठ्ठलभक्तांनी जी सेवा केली, ती खरोखरच प्रेरणादायी आहे — आणि त्याची माहिती समाजातील अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. शेटे यांनीही केले आहे.

## तुमचे आजचे कर्तृत्वच उद्याचे नेतृत्व ठरवते : शिवराज भुमरे



तभा वृत्तसेवा

**पैठण दि :-**भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचालित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर पैठण येथील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास कटिबद्ध राहत त्यांच्यातील सुप्त गुणांचा वेध घेत, त्यांच्या पंखाना बळ देण्यासाठी नेतृत्व गुणांचा विकास होण्याच्या दृष्टीने शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

नेतृत्व गुणविकास शिबीराचे यशस्वी नियोजन मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात शिबीर प्रमुख विनोद सरोदे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख उज्वला कुटे व सर्व शिक्षक यांनी यशस्वी पार पाडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन विराज सरोदे,स्पर्शीका बोन्द्रे, ईश्वरी पाखरे,श्री औताडे, सृष्टी पाटील, महेश सांगळे, धनश्री भुसारे, प्रिती टरमाळे, आर्या सावंत इत्यादी विद्यार्थ्यांनी केले.

विविध क्षेत्रातील सक्षम नेतृत्व शिरोमणी असलेल्या यशस्वी व्यक्तीतर्फे व्याख्याने या निमित्ताने आयोजित करण्यात आली होती.प्रथम उद्घाटन व उद्बोधन सत्रामध्ये प्रमुख वक्ते तथा युवानेतृत्व जिप सदस्य शिवराज भैय्या भुमरे प्रमुख अतिथी पं.स. सभापती वैशाली ताई बोंबले, पत्रकार किरण जाधव, कार्यक्रमाचे अध्यक्ष जुगलकिशोर लोहिया(कार्यवाह, स्था. वि. समिती ,पैठण) केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, विशेष उपस्थित प्रियंकाताई भुजंग(प. स. सदस्य) वैभव मुळे (सरपंच,ढोरकीन),अक्षय मुळे (सामाजिक कार्यकर्ते),महेश मापारी(सामाजिक कार्यकर्ते) या सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते शिबीराचे उद्घाटन भारतमातेच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वल करून करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी केले व शिबीराचा हेतू व उद्देश स्पष्ट केला. समजाप्रती शाळेचे योगदान सांगण्यात आले.

प्रमुख वक्ते युवा नेतृत्व शिवराज भैय्या यांनी विद्यार्थ्यांच्या मनाचा वेध घेत. त्यांना पूरक असे संवाद साधत नेतृत्व या शब्दाची प्रत्यक्षानुभूती दिली.नेतृत्व व कर्तृत्व कुणाकडून मागून मिळत नाही ते स्वतःलाच निर्माण करावे लागते. हे सांगून माझ्या आयुष्याचा खरा पाया ज्या ज्ञानाच्या आगारात रचला गेला त्या माझ्या मराठी शाळेचा मला अभिमान वाटतो असे मत व्यक्त केले.नेतृत्व करायचे असल्यास प्रत्येकाचे मत ऐकून घेतले पाहिजे तेथे आपले योगदान कसे देता येईल यासाठी प्रयत्न करणारे खरे नेतृत्व होय. असे मुलांना मार्गदर्शनात सांगितले.

यासामवेत प्रमुख अतिथी असलेल्या वैशाली ताई बोंबले यांनी स्त्री नेतृत्वाची झलक आपल्या पहाडी आवाजातील मार्गदर्शनाने दाखवून दिली. प्रियंका ताईंनी उपस्थित मान्यवरांचे ऋणनिर्देशव्यक्त करत शाळेच्या विकासासाठी आम्ही सतत सहाय्यक राहू अशी मान्यवरांच्या वतीने ग्वाही दिली.

दुसऱ्या सत्राचे लक्षवेधी वक्ते युवा शेतकरी म्हणून तालुक्याचे भुषण ठरलेले यज्ञेश कातबने यांनी "माझी शेती माझा अभिमान" हा विषय मांडला. उच्चशिक्षित नवतरूणाने शेतीत केलेले नवनवीन प्रयोग व सेंद्रिय शेती यावरील मार्गदर्शन विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरले. याप्रसंगी शेती विषयी असलेले विविध प्रश्न उपस्थितानी विचारले त्याचे योग्य निराकारण करण्यात आले.

तदनंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे इ.पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी अल्पावधीत उत्तम तयारी करून कलादर्शक व गुणदर्शन कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

समारोप सत्रातील मुख्य आकर्षण होते उत्कृष्ट गायक व आदर्श शिक्षक सिराज पठाण मार्गदर्शन व मंत्रमुग्ध गायन यांचा सुंदर संगम साधत हे सत्र आनंददायी व गोड करत कार्यक्रमाचा समारोप केला.

### टोयोटा किर्लोस्कर मोटरने आरोग्य सुविधा अधिक मजबूत केल्या आहेत

**छत्रपती संभाजीनगर:** टोयोटा किर्लोस्कर मोटर ने आज महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील बिडकीन येथील कम्युनिटी हेल्थ सेंटर ) मध्ये आरोग्य पायाभूत सुविधा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याची घोषणा केली. आरोग्य व स्वच्छता यावर केंद्रित असलेल्या आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी ( उपक्रमाचा एक भाग म्हणून, टीकेएम ने या आरोग्य केंद्रात आवश्यक वैद्यकीय उपकरणे पुरवली व बसवली आहेत. या उपक्रमाचा लाभ पैठण तालुक्यातील 70,000 हून अधिक नागरिकांना होणार आहे. पैठण तालुका सुमारे 3.8 लाख लोकसंख्येला सरकारी आरोग्य सुविधांच्या नेटवर्कद्वारे सेवा पुरवतो. या भागात मातृत्व व बाल आरोग्य सेवा, आपत्कालीन प्रतिसाद सेवा आणि प्राथमिक आरोग्य सेवांची मागणी वाढत आहे. या महत्त्वाच्या आरोग्य गरजा लक्षात घेऊन टोयोटा किर्लोस्कर मोटरने सीएचसी बिडकीनला सर्वसमावेशक वैद्यकीय उपकरणे पुरवून सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा मजबूत केल्या आहेत आणि दर्जेदार आरोग्य सेवांपर्यंत पोहोच सुधारली आहे.

### आयडीएफसी फर्स्ट बँकेचा आर्थिक तिमाही चा निकाल

**मुंबई :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज 30 जून 2026 रोजी समाप्त झालेल्या पहिल्या तिमाहीचे (आर्थिक वर्ष 2027 ची पहिली तिमाही) अनलेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले. बँकेने आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाही मध्ये आतापर्यंतचा सर्वाधिक तिमाही करानंतरचा निव्वळ नफा (पीएटी) ₹1,075 कोटी नोंदवला असून, तो आर्थिक वर्ष 2026 च्या पहिली तिमाही मधील ₹463 कोटींच्या तुलनेत 132.4% ने वाढला आहे. निकालांवर भाष्य करताना व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, "आमच्या कामकाजाच्या केंद्रस्थानी उच्च दर्जाची गव्हर्नन्स मानके असलेली एक सक्षम आणि विश्वासार्ह बँक उभारण्याचा आमचा संकल्प आहे.

### संभव स्टीलचे "स्टेनलेस स्टील कनेक्ट 2026" संपन्न

**पुणे :** संभव स्टील ट्यूब्स लिमिटेडच्या स्टेनलेस स्टील विभागाने आपले अधिकृत पाईप असोसिएट श्री साई स्टील (तापी) आणि त्यांचे स्टॉकिस्ट व वितरक आशापुरी स्टील (पुणे) यांच्या सहकार्याने पुण्यात "स्टेनलेस स्टील कनेक्ट २०२६" या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमात पुणे व परिसरातील १०० हून अधिक स्टील रिटेलर्सनी सक्रिय सहभाग नोंदवला . या प्रसंगी संभव स्टीलच्या स्टेनलेस स्टील विभागाचे नॅशनल सेल्स हेड श्री बृजेश त्रिपाठी यांनी सांगितले की, कंपनी आधुनिक उत्पादन सुविधा आणि कडक गुणवत्ता मानकांसह उच्च दर्जाच्या स्टेनलेस स्टील कॉइलचे उत्पादन करत आहे. त्यांनी सांगितले की संभव स्टीलसोबत झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत (MoU) श्री साई स्टील या उच्च दर्जाच्या स्टेनलेस स्टील कॉइलपासून पाईप व ट्यूब तयार करून प्रादेशिक बाजारपेठेतील वाढती मागणी पूर्ण करण्याच्या दिशेने कार्यरत आहे.

### उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा तिमाही नफा ₹317 कोटी

**पुणे :** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीत 317 कोटी रुपयांचा करपश्चात नफा नोंदवत दमदार आर्थिक कामगिरी केली आहे. या पार्श्वभूमीवर बँकेने आर्थिक वर्ष 2027 साठी आरओए गायडन्स 1.8% वरून 2.0% पर्यंत वाढवली आहे. जून 2026 अखेर बँकेच्या ठेवी 24.6% वाढून 48,129 कोटी रुपये, तर एकूण कर्जपुस्तक 28.9% वाढून 42,903 कोटी रुपयांवर पोहोचले. निव्वळ व्याज मार्जिन 8.5% आणि निव्वळ व्याज उत्पन्नविक्रमी 1,186 कोटी रुपये झाले. बँकेचे जीएनपीए 2.17% आणि एनएनपीए 0.34% पर्यंत सुधारले असून मालमत्ता गुणवत्ता अधिक मजबूत झाली आहे. सुरक्षित कर्जपोर्टफोलिओ, वाढत्या ठेवी आणि कार्यक्षमतेच्या जोरावर बँकेने आर्थिक वर्ष 2027 मध्ये 25% मालमत्ता वाढीचे उद्दिष्ट कायम ठेवले आहे.

### एसबीआय लाईफ इन्शुरन्सचा नवीन व्यवसाय प्रीमियम 8,908 कोटी रूपयांवर पोहोचला

मुंबई - एसबीआय लाईफ इन्शुरन्स या देशातील अग्रगण्य जीवन विमा कंपनीने ३० जून २०२६ रोजी संपलेल्या कालावधीसाठी ८,९०८ कोटी रूपयांचा नवीन व्यवसाय प्रीमियम नोंदवला आहे, जो ३० जून २०२५ रोजी संपलेल्या कालावधीतील ७,२६८ कोटी रूपयांच्या तुलनेत अधिक आहे. ३० जून २०२५ रोजी संपलेल्या कालावधीच्या तुलनेत रेग्युलर प्रीमियममध्ये ४० टक्के वाढ झाली आहे. संरक्षणावर स्पष्ट भर देत, ३० जून २०२६ रोजी संपलेल्या कालावधीसाठी एसबीआय लाईफचा प्रोटेक्शन नवीन व्यवसाय प्रीमियम १,९५८ कोटी रूपयांवर पोहोचला असून १०० टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. प्रोटेक्शन इंडिव्हिज्युअल नवीन व्यवसाय प्रीमियमने २२ टक्क्यांची वाढ नोंदवली असून ३० जून २०२६ रोजी संपलेल्या कालावधीसाठी २०२ कोटी रूपयांवर राहिला. इंडिव्हिज्युअल नवीन व्यवसाय प्रीमियम ५,६१३ कोटी रूपयांवर पोहोचला असून ३० जून २०२५ रोजी संपलेल्या कालावधीच्या तुलनेत त्यात १४ टक्क्यांची वाढ झाली आहे.


### एसबीआय लाईफ पॅरा स्पोर्ट्स 2026 साठी भारतीय पथकाचा प्रिन्सिपल पार्टनर

मुंबई - भारतातील खासगी जीवन विमा कंपनी एसबीआय लाईफ इन्शुरन्सने पॅरालिम्पिक समिती ऑफ इंडिया (PCI) सोबतची भागीदारी अधिक दृढ करत 2026 च्या पॅरा स्पोर्ट्स सीझनसाठी भारतीय पथकाचा प्रिन्सिपल पार्टनर बनण्याची घोषणा केली आहे. या अंतर्गत कंपनी ग्लासगो येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ पॅरा गेम्स 2026 आणि जपानमधील आयची-नागोया आशियाई पॅरा गेम्स 2026 साठी भारतीय पथकाची ऑफिशियल लाईफ इन्शुरन्स पार्टनर असेल. या भागीदारीद्वारे एसबीआय लाईफ भारतातील पॅरा-खेळाडूंच्या जिद्द, मेहनत आणि यशाला प्रोत्साहन देत त्यांना आत्मविश्वासाने आपल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी पाठबळ देण्याच्या वचनबद्धतेला बळकट करत आहे.

### होंडा इंडिया फाऊंडेशनने पोलिसांची गतिशीलता वाढवली

**मुंबई :** भारतातील सर्व होंडा ग्रुप कंपन्यांची सीएसआर शाखा असलेल्या होंडा इंडिया फाऊंडेशनने (HIF) आज मुंबई पोलिसांना १०१ आपत्कालीन प्रतिसाद वाहने (ERVs) सुपूर्द केली. गतिशीलता-केंद्रित सीएसआर प्रयत्नांद्वारे सार्वजनिक सुरक्षा संस्थांना दिलेला आपला पाठिंबा याद्वारे अधिक मजबूत करण्यात आला आहे. या तैनातीमध्ये १०० होंडा सीबी३५० मोटरसायकल आणि पोलिसांच्या वापरासाठी खास बदल केलेली एक होंडा एलिव्हेट यांचा समावेश आहे. ही वाहने मुंबईतील जास्त वर्दळीच्या भागांमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांची गतिशीलता वाढवण्यासाठी, गस्त घालण्यासाठी आणि क्षेत्रीय प्रतिसाद क्षमता मजबूत करण्यासाठी मदत करतील. या वाहनांचा शुभारंभ सोहळा मुंबईतील वरळी येथे श्री मोहम्मद सुवेझ हक, आयपीएस, सह पोलीस आयुक्त (प्रशासन), मुंबई; श्री पियुष मित्तल, उपाध्यक्ष आणि कार्यकारी प्रमुख, सामान्य व्यवहार आणि कॉर्पोरेट व्यवहार, होंडा कार्स इंडिया लि.; श्री राजीव तनेजा, कार्यकारी अधिकारी, होंडा इंडिया फाऊंडेशन; यांच्या उपस्थितीत पार पडला. आणि मुंबई पोलीस व होंडा इंडिया फाउंडेशनचे वरिष्ठ प्रतिनिधी.

### गणपत वरपे यांचे निधन



**सिल्लोड प्रतिनिधी :** गावातील ज्येष्ठ नागरिक गणपत सांडू वरपे यांचे दिनांक 25 जुलै रोजी मंगरूळ येथे दुःखद निधन झाले त्यांच्या पाश्चात पत्नी एक भाऊ एक बहीण दोन मुले नातवंडे असा मोठा परिवार आहे शिवसेनेचे विभाग प्रमुख राजू वर्पे व माजी सरपंच मंगरूळ संजय वरपे यांचे ते वडील होते.

## वृक्ष संवर्धनाचा संदेश देत गुणवंतांचा गौरव;जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव येथे वृक्षारोपण सोहळा उत्साहात



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२७ जुलै :** आज लावलेले एक झाड म्हणजे उद्याच्या पिढीला दिलेली अमूल्य भेट होय. वृक्ष हे मानव जीवनाचे आधारस्तंभ असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी,शुद्ध प्राणवायू,अन्न, औषधे व नैसर्गिक संपत्तीचे जतन करण्यासाठी वृक्षांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.हीच जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनावर आधारित प्रभावी नाटिका सादर करून झाडे लावा,झाडे जगवा हा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचविला. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे पर्यावरण संरक्षणाची प्रेरणा सर्वांना मिळाली. याच कार्यक्रमात चौथी व सहावी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनितताई मोटे (सभापती, शिक्षण समिती,जि.प.छत्रपती संभाजीनगर)या होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे उपस्थित होत्या.यावेळी वृषाली मिरकर (पंचायत समिती सदस्या,सिल्लोड),सभापती उत्तम चव्हाण,राहुल अंकुश राठोड पंचायत समिती सदस्य,नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपनगराध्यक्षा सुरेखाताई काळे,गजानन पवार, नगरसेविका संध्या मापारी,अमोल जगताप गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव,अक्षय धांदर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती सोयगाव,सचिन पाटील शिक्षण विस्तार अधिकारी,सोयगाव,फिरोज तडवी (केंद्रप्रमुख, सोयगाव),भगवान सोनवणे अध्यक्ष,शालेय व्यवस्थापन समिती,रवींद्र काळे अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ,बाबूशा (माजी विद्यार्थी संघ सदस्य,दत्तू रोकडे माजी विद्यार्थी संघ सदस्य,मयूर मनगटे,दत्तात्रेय सोनी,मुख्याध्यापक दादाराव राठोड,भास्कर चौधरी, मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,वरंध सर,धनराज बापू यांच्यासह शिक्षक,पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाखो जय बाबाजी भक्त परिवाराच्या उपस्थितीमध्ये वेरुळ येथे होणार गुरु पूर्णिमा सोहळा

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी. सतोष करपे. महाराष्ट्रातील संत परंपरेतील थोर संत ब्रह्मलीन जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांची कर्मभूमी असलेले श्रीक्षेत्र वेरूळ येथे त्यांनी स्थापित केलेल्या श्री संत जनार्दन स्वामी आश्रम परिसरामध्ये दिनांक २९ तारखेला गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने महाराष्ट्रभरातून परमपूज्य बाबाजींच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लाखो भाविकांची उपस्थिती राहणार असून उत्तर अधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या शुभहस्ते व उपस्थितीमध्ये लाखो भाविकांच्या सहभागाने सकाळी आठ वाजता बाबाजींच्या पादुकांची सहवाध्य मिरवणूक संपन्न होईल

**जगद्गुरु जनार्दन स्वामी यांची २१ फुट उंचीची पंचधातूची मूर्ती. बसवणार जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज**

त्यानंतर कार्यक्रम स्थळी बरोबर दहा वाजता बाबाजींच्या पादुकांचे पाद्य पूजन संपन्न होईल याप्रसंगी आश्रमीय सर्व साधुसंत व परमपूज्य बाबाजींना गुरुस्थानी मानणारे राजकीय व सामाजिक जीवनातील महत्त्वपूर्ण पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे गुरु पौर्णिमा निमित्त परमपूज्य बाबाजींनी स्थापित केलेल्या गुरुकुला मधील हजारो विद्यार्थ्यांचे संस्कार शिबिराचे आयोजन दि २७ तारखेपासून ते दि ३ तारखेपर्यंत या संस्कार शिबिराचा आयोजन केलेला आहे (यावर्षी गुरु पौर्णिमा सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज यांची पंचधातूची २१ फूट उंचीची मूर्ती बनवण्याचा संकल्प जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांनी केला असून एवढ्या उंचीची भारतातील बाबाजींची सर्वात मोठी मूर्ती गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने गुरुदक्षिणा म्हणून अर्पण होणाऱ्या आर्थिक योगदानातून परमपूज्य बाबाजींची मूर्ती तयार होणारा असल्याची माहिती जय बाबाजी परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी दिली

भविष्यामध्ये श्रीक्षेत्र वेळ आश्रमामध्ये कायमस्वरूपी ही मूर्ती स्थापित केली जाईल महाराष्ट्र घरातून येणाऱ्या भाविकांसाठी गुरु पूर्णिमा महोत्सव समितीच्या वतीने त्यांच्या फराळाची व पिण्याचे पाणी यासोबत वाहनांचे पार्किंग यासोबत वैद्यकीय व्यवस्था भव्य व्यासपीठ लाखो भाविकापर्यंत व्यवस्थित आवाज जाईल अशी साऊंड व्यवस्था जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे तरी शिष्यांच्या दृष्टीने असलेला महत्त्वपूर्ण दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा आपल्या सद्गुरूंच्या दर्शन व गुरु पौर्णिमा निमित्त मिळणाऱ्या मार्गदर्शन रुपी प्रसादासाठी महाराष्ट्रातील सर्व भाविक भक्तांनी तन-मन धनाने मदत करावी व उपस्थित रहावे अशी आव्हान जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी केले आहे.

## आषाढी वारीनिमित्त एमजीएमच्या विद्यार्थ्यांची स्वच्छता मोहिम

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने वाळूजजवळील प्रसिद्ध छोटा पंढरपूर येथे स्वच्छता मोहिम राबवली. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यापीठाच्या वतीने स्वच्छतेचा संकल्प घेत १०० हून अधिक स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे यामध्ये सहभाग नोंदवला. या मोहिमेमध्ये विद्यापीठाचे जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय, डॉ.जी.वाय. पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी, युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस आदि महाविद्यालये सहभागी झाले होते.

छोटा पंढरपूर येथे दरवर्षी आषाढी एकादशीला हजारो भाविकांची उपस्थिती असते. या पार्श्वभूमीवर परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी एमजीएमच्या एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. स्वयंसेवकांनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात तसेच यात्रा मार्गावर स्वच्छता करत ओला-सुका कचरा वेगवेगळा गोळा केला व तो महानगरपालिकेच्या संकलन केंद्राकडे सुपूर्द केला.स्वच्छता मोहिमेत विद्यापीठाचे एनएसएसचे समन्वयक डॉ.आर.आर.देशमुख, विद्यापीठाचे प्राध्यापक व कर्मचारी सहभागी झाले होते. या उपक्रमात दरवर्षी विद्यार्थी हिरीरीने सहभागी होत असतात. 'नॉट मी बट यु' हे एनएनएसचे ब्रीद घेऊन विद्यार्थी आपले योगदान वारीमध्ये देत असतात. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ झाली असल्याचे डॉ. देशमुख यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमात विद्यापीठातील प्राध्यापक डॉ.वंदना मालोदे,डॉ.आर.डी.कोकाटे, डॉ.सामी, डॉ.दानिश अली, डॉ.रवी कोमटे, डॉ.किरण जाधव व सर्व संबंधित उपस्थित होते.

## श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन च्या विद्यार्थ्यांचे गिरनेर डोंगर परिसर गिरीभ्रमण मोहिम यशस्वी



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि २६ जुलै :** श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष पद्मविभूषण कै. गोविंदभाई श्रॉफ यांच्या जयंतीनिमित्त प्रशालेतील विद्यार्थ्यांचे गिरनेर डोंगर परिसर येथे गिरिभ्रमण आयोजित करण्यात आले होते .या गिरिभ्रमणा दरम्यान विद्यार्थ्यांनी पक्षी, फुले व प्राणी यांचे निरीक्षण नोंदवले. डोंगरावर विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली व ट्रेकिंगचा रोमांचकारी क्षण अनुभवले. प्रशालेतील एनसीसी विभागाचे ७४ विद्यार्थी -विद्यार्थिनी , गाईड विभागाच्या ८ विद्यार्थिनी व प्रशालेतील इतर ११ विद्यार्थी- विद्यार्थ्यांनी असे एकूण ५९ विद्यार्थिनी व ३४ विद्यार्थी एकूण ९३ विद्यार्थी व ७ शिक्षक या मोहिमेत सहभागी झाले होते. एनसीसी ऑफिसर सोकटकर बाबासाहेब, क्रीडाशिक्षक कांबळे अनिल, शिंदे राहुल, गाईड प्रमुख सुरेखा जैन, श्यामल मेश्राम , डोंगरे सर , अभिजित इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली ही मोहीम यशस्वी झाली. गिरी भ्रमण मोहीम यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे डॉ .मिलिंद कोनार्डे, प्रशालेचे अध्यक्ष किसन तोतला, मुख्याध्यापिका मनिषा मिश्रा ,सदस्य नंदकुमार वैद्य, मच्छिंद्र हाडे, डॉ अंताराम धरपळे किशोर कुलकर्णी ,जगन्नाथराव आर्वीकर, बबन ठाणगे, संजय दौंडे, प्रभारी पर्यवेक्षक महेश बाहाळकर , राजू शिंदे यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

## रोटरी क्लब पैठणच्या अध्यक्षपदी पवन लोहिया



तभा वृत्तसेवा

**पैठण दि २७ :** रोटरी क्लब, पैठणच्या सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवारी उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. या सोहळ्यात रो. पवन लोहिया यांनी अध्यक्षपदाची, रो. गजानन आवारे यांनी उपाध्यक्षपदाची तर रो.बलराम लोळगे यांनी सचिवपदाची सूत्रे स्वीकारली. उपस्थित मान्यवरांच्या शुभेच्छा आणि रोटेरियन्सच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाला डिस्ट्रिक्ट गव्हर्नर (DGN) रो. सतीश लोणीकर, सहाय्यक प्रांतपाल रो. प्रतिक नानावटी तसेच क्लब ट्रेनर डॉ. व्हलेरियन फर्नांडिस यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रास्ताविकात डॉ. व्हलेरियन फर्नांडिस यांनी रोटरी क्लब पैठणच्या ४७ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी आणि मानवसेवा या क्षेत्रांमध्ये क्लबने केलेल्या उल्लेखनीय कार्याची माहिती दिली.

प्रमुख पाहुणे रो. सतीश लोणीकर यांनी रोटरीच्या आरोग्यविषयक सेवांचा उल्लेख करत महिलांमधील गर्भाशयाच्या कर्करोगासह इतर आजारांचे वेळेवर निदान व्हावे यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तीन अत्याधुनिक तपासणी रुग्णवाहिका कार्यरत असल्याचे सांगितले.

## प्रवाहचे रामेश्वर गोर्डे यांना स्व. अजितदादा पवार पुरस्कार



**तभा वृत्तसेवा पैठण दि 27 :-**पैठणचे प्रवाह अनाथाश्रमचे संस्थापक रामेश्वर गोर्डे यांना सपत्नीक लोकनेते स्व. अजितदादा पवार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण यांच्या पुढाकारातून, दैनिक लोकमत पुणेचे संपादक संजयजी आवटे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे हा मानाचा पुरस्कार गोर्डे यांना देण्यात आला.

यावेळी हा क्षण निश्चितच आनंदाचा, अभिमानाचा आणि आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे. पण या आनंदाच्या क्षणीही मनाच्या एका कोपऱ्यात आईची उणीव अधिकच तीव्रतेने जाणवत आहे. कारण माझ्या प्रत्येक यशामागे तिचे अथक कष्ट, निःस्वार्थ त्याग, मायेची ऊब आणि आयुष्याला योग्य दिशा देणारे संस्कार आहेत.

आज आई प्रत्यक्ष माझ्यासोबत नसली, तरी तिचे आशीर्वाद, तिची शिकवण आणि तिच्या प्रेमाची सावली प्रत्येक पावलावर माझ्यासोबत आहे, याची मला खात्री आहे. माझ्या आयुष्यात मिळालेला प्रत्येक सन्मान हा तिच्याच त्यागाचा, तिच्या संस्कारांचा आणि तिच्या विश्वासाचा परिपाक आहे.असे मनोगत गोर्डे यांनी व्यक्त केले.

लोकनेते स्व. अजितदादा पवार हे काम, वेळेचे नियोजन आणि लोकसेवेप्रती असलेल्या समर्पणासाठी सदैव ओळखले जातात. त्यांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार म अत्यंत प्रेरणादायी आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. मनापासून एकच भावना व्यक्त करावीशी वाटते—जर हा पुरस्कार त्यांच्या जयंतीऐवजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त प्रदान करण्यात आला असता, तर त्या क्षणाचा आनंद अधिकच द्विगुणित झाला असता. घड्याळाच्या काट्याप्रमाणे वेळेला महत्त्व देणारा, कामालाच आपले जीवन मानणारा असा नेता महाराष्ट्राने गमावला आहे. तरीही त्यांच्या नावाचा हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे आणि त्याचा मी मनःपूर्वक स्वीकार करतो असे ही गोर्डे यावेळी म्हणाले.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क.५१३/२०२६

अर्जदार :-१) जनार्दन रंगनाथ वखारे वय ६८ वर्षे धंदा शेती रा. समतानगर, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) कमलाकर रंगनाथ वखारे वय ५८ वर्षे धंदा शेती रा. भंडाळा ता. गंगापुर ह.मु. गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) शंकर रंगनाथ वखारे वय ५२ वर्षे धंदा शेती रा. भेंडाळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) लताबाई भ्र. आनंद बिडवे, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. भराडी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे वावत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. रविराज बी. दारुंटे यांचे मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.१ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व वहिण आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांची आई नामे ताराबाई रंगनाथ वखारे या मौजे भेंडाळा ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या, त्या दिनांक २८/०७/२०२४ रोजी मौजे भेंडाळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहे. मयत ताराबाई रंगनाथ वखारे यांना अर्जदार क्र.१ ते-४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत 'साराबाई रंगनाथ वखारे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्युपश्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने मा. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्यीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २७/०७/२०२६ रोजी दिले.

प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०८/०९/२०२६ रोजीची आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## अग्रलेख

# आंदोलनाच्या सांगतेनिमित्त...

लोकतांत्रिक देशात सरकारे बदलत असतात. निवडणुकीच्या प्रक्रियेतून एक पक्ष सत्तेतून बाहेर जातो, दुसरा येतो. पण, व्यवस्था मात्र तीच राहते. या व्यवस्थेत काम करणारे लोक कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील असावेत, अशी अपेक्षा असते. काही प्रामाणिक आणि जनतेची कामे कारणारी असतातच; पण दुर्दैवाने ही व्यवस्था चालविणारी बहुतांश माणसे गेंड्याच्या कातडीची, बेईमान आणि भ्रष्ट असल्याचे वारंवार दिसून येते. अशा बेईमानांमुळे व्यवस्थेत निर्माण झालेल्या भेगांमधूनच जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन उभे राहिले. युवाशक्तीच्या भावना समजून घेत सरकारने ते आंदोलन अत्यंत कुशलतेने हाताळले. प्रतिष्ठेचा मुद्दा न करता लवचीकता दाखवत आंदोलकांच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला गेला आणि २६ दिवस चाललेल्या आंदोलनाची सकारात्मक सांगता झाली. हे आंदोलन आणखी दीर्घ काळ चालावे, ते चिघळावे, हिंसाचार व्हावा, राजधानी दिल्लीत आणि देशाच्या कानाकोपऱ्यात गोंधळ निर्माण व्हावा, यासाठी देशविरोधी तत्त्वांनी प्रयत्न केले. त्यांना विरोधी पक्षांनी साथ दिली. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार संवेदनशील व सकारात्मक असल्याने त्यांचे सारे प्रयत्न फोल ठरले.

अलिकडच्या काळात श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ या आपल्या शेजारी देशांमध्ये युवकांनी केलेल्या आंदोलनांमुळे सरकारे बदलली. पण, या देशांमधील सत्ताबदल हा हिंसक स्वरूपाचा होता. आंदोलकांनी सार्वजनिक आणि खाजगी संपत्तीची हानी करीत लूटमार केल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यातील काही आंदोलनांना धर्माची किनारही होती. शेजारी देशांत जे काही घडले, त्याची तुलना भारतातील जेन-झीच्या आंदोलनाशी होऊ शकत नाही. कारण, जंतरमंतरवरील आंदोलनात किरकोळ घटना वगळता फारशी अप्रिय घटना घडली नाही. गर्दीला मेंदू नसतोच. तरीही युवा पिढीची ही गर्दी बरीच संयमित राहिली. तब्बल २६ दिवस युवकांनी शांततेत आंदोलन केले. व्यवस्थेतील उणिवा दूर करण्यासाठी प्रसंगी युवक मोठे आंदोलन उभे करू शकतात, विद्यार्थ्यांची चळवळ उभी राहू शकते, हे या आंदोलनाने सिद्ध केले. अशा आंदोलनाच्या उभारणीत आणि युवाजनांना एकमेकांशी जोडण्यात नवमाध्यमे महत्त्वाची भूमिका वठवू शकतात, हे सुद्धा या आंदोलनातून दिसून आले. विद्यार्थ्यांच्या जीवनात परीक्षा हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असतो. स्पर्धात्मक परीक्षांचे महत्त्व त्यातही मोठे असते. त्यामुळे परीक्षा घेणाऱ्या संस्थेची आणि त्यामध्ये काम करणाऱ्यांची विश्वासार्हता संशयातीत असणे आवश्यक असते. तथापि, काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे एनटीएच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. सरकारने या भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुद्ध अत्यंक कठोर निर्णय घेत त्यांना घरचा रस्ता दाखविला. एकाचवेळी या स्तरावरील ४७ अधिकाऱ्यांना घरचा रस्ता दाखविण्याची ही देशातील पहिलीच मोठी कारवाई असावी. ही कारवाई सनदी नोकरशाही व्यवस्थेत ठाण मांडून बसलेल्या झारीतल्या शुक्राचार्यांसाठी मोठा धडा ठरली आहे. पैशासाठी युवकांच्या जीवनाशी खेळणाऱ्या या अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या कारवाईमुळे भविष्यात अधिकारी भ्रष्ट वर्तन करण्यापूर्वी हजारवेळा विचार करतील, एवढी ही कारवाई धडक होती. त्यासाठी सरकारचे कौतुक केले पाहिजे. युवकांच्या भावनांची दखल घेत शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. तसा नीटच्या पेपरफूट प्रकरणाशी धर्मेंद्र प्रधान यांचा प्रत्यक्ष काहीही संबंध नव्हता. तरीही लोकशाहीत जबाबदारी निश्चित करण्याची पद्धत आहे. या विभागाचे मंत्री म्हणून जबाबदारीच्या भूमिकेतून धर्मेंद्र प्रधानांनी पद सोडले. उत्तरदायित्व स्वीकारण्याच्या संदर्भात धर्मेंद्र प्रधान यांनी जे उदाहरण स्थापित केले आहे, ते राजकीय असो की सनदी, सर्व व्यवस्थांसाठी आदर्श ठेवावा असेच आहे. आता तरी, आपण जनतेचे जावई नव्हे तर नोकर आहोत, सेवक आहोत हे सनदी व्यवस्थेतील मस्तवाल धेंडांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. यापुढे प्रत्येक मंत्र्यालाही दक्ष राहावे लागणार आहे. आपल्या खात्यात कार्यरत अधिकाऱ्यांची सतत झाडाझडती घेत राहावे लागणार आहे, असाही या घटनाक्रमाचा सांगावा आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून आणखी एक गोष्ट पुढे आली आणि ती म्हणजे आंदोलन चिघळविण्याचे विरोधकांचे मनसुबे होते. काही विघातक शक्तीही त्यांच्या सोबत होत्या. साऱ्यांचे मनसुबे पुरते उधळले गेले. सरकार आणि आंदोलक या दोन्ही बाजूंकडून या गदारोळात राजकीय पोळी शेकू पाहणाऱ्यांना जागा दाखविली गेली. प्रथम सोनम वांगचुक आणि त्यानंतर अभिजित दीपके यांनी शांततेने आंदोलन सुरू ठेवले होते. त्यात शरद पवार, राहुल गांधी, प्रियांका वढेरा, अखिलेश यादव, उद्धव ठाकरे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन युवकांची माथी भडकविण्याचा प्रयत्न केला. आंदोलनाच्या शेवटच्या दोन दिवसांत राहुल गांधी आणि काँग्रेसच्या नेत्यांनी थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानानजीक ठिय्या आंदोलन करीत प्रसिद्धी मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. सरकारने तेथील आंदोलनही कुशलतेने हाताळले आणि विद्यार्थ्यांच्या चळवळीचे राजकीयीकरण करण्याचा विरोधकांचा कुटिल डाव हाणून पाडला. देशाच्या अन्य भागांतही आंदोलने झालीत. काही अप्रिय घटना घडल्या. मुंबईतही आझाद मैदानावर आंदोलन झाले. पण, हे आंदोलन शांततेत चालले. महाराष्ट्रात ज्यांचे राजकीय अस्तित्व पणाला लागले आहे, त्या ठाकरे बंधूंनी जंतरमंतरवरील आंदोलनाचा फायदा घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर, या मार्गावर त्यांनी मोर्चाचे आयोजन केले होते. यानिमित्ताने राजकीय वातावरण तापविण्याचे त्यांचे प्रयत्न होते. काँग्रेस पक्षही या मोर्चात सहभागी होणार होता. निवडणुकांमध्ये महाराष्ट्राच्या जनतेने दोन्ही ठाकरे बंधूंना भुईसपाट केले आहे. जंतरमंतरवरील आंदोलनाचा फायदा घेऊन आपल्या कार्यकर्त्यांना उत्साहाचे उधारीचे इंजेक्शन देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. परंतु, सरकार व आंदोलक यांच्यात चर्चा होऊन आंदोलनच संपुष्टात आल्याने ठाकरे बंधूंचे मनसुबे पुरते उधळले गेले. युवकांचे आंदोलन हायजॅक करून सरकारला अडचणीत आणण्याचा कट हाणून पाडला गेला आणि विरोधकांना भाव देण्याची गरज पडणार नाही अशी स्थिती सरकारने निर्माण केली. विरोधक शेवटपर्यंत धडपडत आणि चाचपडत राहिले. सरकारने विरोधकांशी चर्चा केली नाही. विरोधकांनी आपल्याला भाव मिळावा असा प्रयत्न जरूर केला. पण, ज्या युवकांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन चालविले, त्यांच्याशीच थेट बोलणी करीत सरकारने काँग्रेससह साऱ्याच विरोधकांची हवाच काढली. सारांश, युवाशक्तीचे आंदोलन आजही उभे होऊ शकते, हे या आंदोलनामुळे दिसले. सरकारला अशी आव्हाने पेलता येतात हेही यावेळी सिद्ध झाले. त्याहून महत्त्वाचे म्हणजे सत्तेच्या दूर राहून विरोधक कासावीस झालेले असून, त्यांना राजकीय पोळ्या शेकण्यासाठी कोणताही मुद्दा पुरू शकतो, हेही या आंदोलनादरम्यान दिसले. तात्पर्य असे की, सरकार आणि आंदोलक या दोन्ही बाजूंच्या भूमिका योग्यरीत्या वठविल्या गेल्या. पण, विरोधकांना त्यात विधायक योगदान देता आले नाही. विरोधकांना या आंदोलनात मध्यस्थी करण्याची संधी होती. ती त्यांनी घेतली नाही. कारण त्यांना अन्य कोणत्याही मुद्यापेक्षा राजकारण महत्त्वाचे वाटले. विद्यार्थ्यांच्या नाराजीवर स्वतःचे राजकारण पुढे नेण्याचा विचार महत्त्वाचा वाटला. विधायकतेच्या संदर्भात विरोधकांची विश्वासार्हता शून्य असल्यामुळे त्यांची कोणतीही मदत घेण्यास किंवा त्यांच्या हातचे बाहुले बनण्यास युवाशक्तीने नकार दिला हे चांगलेच झाले. विरोधक या आंदोलनाचे म्होरके म्हणून वावरले असते तर त्याला राजकारणाचेच स्वरूप आले असते. कदाचित विद्यार्थ्यांचे प्रश्न मागे पडले असते. तसे न होता आंदोलनाची सांगता झाली, याचे समाधान कोणत्याही देशभक्ताला वाटेल. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# गयालालची 'साठी'!

गयालाल! हरयाणाच्या राजकारणात देवीलाल, भजनलाल, बंसीलाल हे तीन 'लाल' प्रसिद्ध की कुप्रसिद्ध मानले गेले. मात्र, देशाच्या राजकारणावर अमिट छाप सोडली ती गयालाल यांनी? कोण हे गयालाल?

५९ वर्षांपूर्वी १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत हरयाणातील तेव्हाच्या हसनपूर, आता होडल या मतदारसंघातून निवडून आलेले गयालाल हे एक अपक्ष आमदार! हरयाणात कोणत्याही पक्षास बहुमत मिळाले नव्हते. सत्ता टिकविण्यासाठी काँग्रेस पक्षाला केवळ एका आमदाराची गरज होती. काँग्रेसची नजर गरीब चेहरा असलेल्या गयालालांवर गेली. गयालाल यांनी काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. सकाळी ११ वा. पत्रपरिषद घेत त्यांनी आपला निर्णय घोषित केला. चार तासांनी म्हणजे दुपारी ३ वाजता गयालाल यांनी पुन्हा पत्रपरिषद बोलविली. त्यांनी विरोधी पक्षांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. पाच तासांनी म्हणजे रात्री ८ वा. गयालाल यांनी दिवसातील तिसरी पत्रपरिषद बोलविली आणि पुन्हा काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी त्यांच्या बाजूला बसलेले काँग्रेस नेते राव बीरेंद्रसिंग उद्‌गारले, 'गया राम, अब आया राम है'! आणि तेव्हापासून देशाच्या राजकारणात 'आया राम गया राम'- हा शब्दप्रयोग रूढ झाला. नंतर अनेक खासदार-आमदारांनी पक्षांतर केले. पण, ९ तासांत तीन वेळा पक्ष बदलण्याचा गयालाल यांचा 'विक्रम' आजवर कुणालाही मोडता आलेला नाही.

**बदललेले दृश्य :** संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. आणि यातील नजरेतून न सुटणारी बाब म्हणजे दोन्ही सभागृहांचे बदललेले दृश्य. राज्यसभेत आम आदमी पक्षाचा १० खासदारांचा गट आता तीनवर येऊन ठेपला आहे. ७ खासदार सत्तारूढ पक्षात गेले आहेत तर लोकसभेत ठाकरे गटाची शिवसेना, ममता बॅनर्जींची तृणमूल काँग्रेस विभाजित होत- त्यातील एक भाग सत्तारूढ गोटात दाखल झाला आहे. पक्षफुटीची ही सारी प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहेत.

**१८ वर्षांनंतर :** भारतीय राजकारणाला पक्षबदलाची कीड १९६७ च्या गयालाल प्रकरणाने लागली, पण त्यावर उपाययोजना करण्यासाठी १९८५ साल उजाडावे लागले, जेव्हा राजीव गांधी सरकारने ५२वी घटनादुरुस्ती करीत घटनेच्या १०व्या परिशिष्टात दुरुस्ती करून पक्षांतराला आळा घालण्याचा प्रयत्न केला.

**सर्वांत मोठी त्रूट :** राजीव गांधी सरकारने पारित करविलेल्या पक्षांतरविरोधी कायद्यातील सर्वांत मोठी त्रूट म्हणजे- पक्षांतर करणाऱ्या सदस्यांच्या विरोधात 'अपात्र'तेची कारवाई करण्याचे अधिकार तर सभापती वा अध्यक्षांना देण्यात आले होते, पण, स्वतः लोकसभा सभापती वा विधानपरिषद अध्यक्ष यांनी पक्षबदल केल्यास त्यांना तसे करण्याची परवानगी देण्यात आली होती. म्हणजे एकप्रकारे-पक्षांतर विरोधी कायद्याचे नैतिक अधिष्ठानच पोकळ-कमजोर करण्यात आले होते.

**फुटीला राजमान्यता? :** राजीव गांधी सरकारने आणलेला पक्षांतरविरोधी कायद्याचा फायदा न होता उलट तोटाच झाला. त्यापूर्वी पक्षांतर 'चिल्लर' स्वरूपात म्हणजे व्यक्तिगत होत होते. या कायद्यानंतर त्याला 'सामूहिकता' आली. याने पक्षफुटीची नवी पद्धत भारतीय राजकारणात सुरू झाली. त्यात एकतृतीयांश - खासदार-आमदार यांनी फुटीर गट स्थापन केल्यास- त्या सदस्यांचे सदस्यत्व कायम राखण्यास मदत झाली. म्हणजे पक्षांतर केल्यास खासदारकी वा आमदारकी जाण्याची भीती वा टांगती तलवार या कायद्याने दूर केली.

**पुन्हा १८ वर्षांनंतर :** १८ वर्षांनंतर पुन्हा या कायद्यात बदल करून कारवाईच्या तलवारीला धारदार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तेव्हा केंद्रात अटलबिहारी वाजपेयींचे सरकार होते. ९१वी घटनादुरुस्ती करीत या कायद्यात काही महत्त्वाचे बदल करण्यात आले व सभागृहाचे सभापती वा अध्यक्ष यांनाही कायद्याच्या चौकटीत आणण्यात आले. हा एक मोठा व आवश्यक बदल होता.

**फूट आणि विलय :** १९८५ सालचा राजीव सरकारने तयार केलेला कायदा व २००३ मध्ये वाजपेयी सरकारने केलेला कायदा यातील सर्वांत महत्त्वाचा व मोठा फरक म्हणजे पहिल्या कायद्यात 'फूट' (स्प्लिट) हा शब्द वापरण्यात आला होता तर दुसऱ्या सुधारित कायद्यात 'विलय' (मर्जर) हा शब्द वापरण्यात आला आहे. ही सारी प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद पूर्ण होण्यासाठी पडून आहेत.

**भाजप नाही :** पक्षफुटींच्या या प्रकरणांमागे भाजपचा हात नसल्याचे सांगितले जाते. ममता बॅनर्जी, अभिषेक बॅनर्जी यांच्या नेतृत्वविरोधात असलेला असंतोष, महाराष्ट्र व पंजाबमधील स्थानिक मुद्दे या कारणांनी ही फूट घडली. पण, जनतेत याची फार चांगली प्रतिक्रिया नाही. मग, यावर उपाय म्हणून तिसरा कायदा आणावा काय- अशी चर्चा घटनातज्ज्ञांमध्ये केली जात आहे. यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे- फूट प्रकरणांचा निर्णय- सभापतींनी विशिष्ट कालावधीत द्यावा असे कोणतेही बंधन त्यांच्यावर घालण्यात आलेले नाही. आणि प्रारंभीच्या काळात-सभापतींच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचीही परवानगी संबंधित पक्षांना नव्हती.

**अभूतपूर्व युक्तिवाद :** लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद यामध्ये घडणाऱ्या घटनांबाबत संबंधित सभागृहाच्या अध्यक्षाचा निवाडा अंतिम असतो. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयालाही बोलण्याचा अधिकार नाही- असे मानले जाते. सभापतींचा हा अधिकार आजही मान्य केला जातो. मात्र, पक्षात फूट पडण्याची प्रक्रिया-घटना- सभागृहाबाहेर घडत असल्याने- त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार दुसऱ्या गटास आहे- हे मान्य करण्यात आले. म्हणजे सभापतींचा अधिकार फक्त आणि फक्त सभागृहात घडणाऱ्या घटनांबाबत आहे. पण, संसद परिसरात एखादी घटना घडली असेल तरी ती सभापतींच्या अधिकार क्षेत्रात येत नाही. आणि म्हणूनच पक्षफूट वा पक्षांतराची प्रकरणे- सर्वोच्च न्यायालयाकडे जाऊ लागली.

**कालमर्यादा नाही :** सर्वोच्च न्यायालयातही अशा प्रकरणांच्या निवाड्यासाठी- कोणतीही कालमर्यादा नाही. याने सामान्य जनतेच्या मनात मात्र- पक्षांतर व एकूणच राजकारण याबाबत चिंता-राग या भावना तयार होत आहेत. आणि निकोप लोकशाहीसाठी हे योग्य मानले जात नाही. मग, पक्षांतरविरोधी कायदा रद्द करून सरसकट सर्वांना पक्षांतरासाठी मोकळीक द्यावी असाही एक युक्तिवाद केला जात आहे. यात मग अंतिम निवाडा- जनता जनार्दन करील हा यामागचा युक्तिवाद आहे.

**न्यूझीलंडचा कायदा :** जगातील एक स्वच्छ व सुंदर देश म्हणजे न्यूझीलंड. या देशात पक्षांतराबाबत कायदा फार कठोर आहे. एखादा सदस्य त्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आला असेल, त्याला आपला पक्ष सोडावयाचा असल्यास, त्याला आपले सदस्यत्वही म्हणजे खासदारकी वगैरे सोडावी लागते.

**अमेरिका-ब्रिटन :** अमेरिका व ब्रिटन यांना लोकशाहीची जननी मानली जाते. तेथे मात्र पक्षांतराबाबत कोणताही कायदा नाही. सारे काही- नैतिक मूल्यांवर सोडून देण्यात आले आहे आणि नैतिक मूल्ये ही कायद्यापेक्षाही प्रभावी असतात. कायद्यात एखादेवेळी पळवाट राहू शकते, पण, नैतिक मूल्ये? त्यात कोणतीही पळवाट नसते. बहुधा म्हणूनच पक्षांतरविरोधी कायदा नसला तरी तेथे 'आयाराम-गयाराम'ची संस्कृती रुजली नाही.

**आता विषवृक्ष :** भारताच्या राजकारणात पक्षांतराचे बीज रोवणारे गयालाल यांचे २००९ मध्ये निधन झाले. त्यांच्या पक्षांतराच्या विक्रमाला आता ६० वर्षे पूर्ण होत आहेत. ६० वर्षांपूर्वी त्यांनी पेरलेले पक्षांतराचे बीज वा रोप आता फोफावले आहे. त्या वृक्षाची जणू 'साठी' होत आहे. आणि तो आता विशाल असा 'विषवृक्ष' झाला आहे. आता हा विषवृक्ष मुळापासूनच उखडून टाकण्याची वेळ आली आहे. अन्यथा लोकशाहीचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताची प्रतिमा डागाळली जाईल आणि लोकशाहीच्या नंदनवनाचे रूप पालटून ते झालेले असेल पक्षांतराचे- दलबदलूंचे बाभूळवन! ■

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# देशाच्या विकासातील प्रमुख अडसर

जंतरमंतरवरील आंदोलनाची सांगता झाली. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर आंदोलकांनी जल्लोष केला. परंतु, आंदोलकांच्या एका गटाने पोलिसांवर दगडफेक करून वातावरण नासवले. यात दोन पोलिस अधिकाऱ्यांसह एक विशेष पोलिस आयुक्त गंभीर जखमी झाले. यावरून हे आंदोलन विद्यार्थ्यांसाठी नाही, तर राजकीय हेतूने प्रेरित होते, ही बाब अधोरेखित झाली. पेपर फोडण्यासारखे प्रकार संघटित गुन्हेगारीत मोडतात. काँग्रेसच्या काळातही असे अनेक प्रकार घडले आहेत. भ्रष्टाचार १०० टक्के संपुष्टात कधीच आणला जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत सर्वांत मोठ्या लोकसंख्येच्या देशात भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविण्यासाठी दीर्घकाळ लागणार नाही का? भ्रष्टाचार हाच देशाच्या विकासातील प्रमुख अडसर आहे.

हळूहळू का होईना भारतातील भ्रष्टाचार कमी होत चालला आहे. डिजिटायझेशनमुळे अनेक क्षेत्रांतील भ्रष्टाचाराला अंकुश लागला आहे. ग्लोबल ट्रान्सपरन्सीने जारी केलेल्या अहवालानुसार युरोप आणि अमेरिकेत भ्रष्टाचारात वाढ झाली असतानाच भारतात भ्रष्टाचाराची प्रकरणे घटल्याचे समोर आले आहे. १८० देशांच्या या अहवालात भ्रष्टाचार निर्मूलनात भारताने २ वर्षांत सुधारणा करताना ९३ वरून ९१ वा क्रमांक प्राप्त केला. अमेरिका २९ व्या तर चीनसारखा शेजारी देश भारतापाठोपाठ ७६ व्या क्रमांकावर आहे.

सरकारकडून ईडी, सीबीआय आणि अन्य संस्थांच्या माध्यमातून भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. यात शासनाने बऱ्याच अंशी यश मिळविले असले तरी मूळ हेतू साध्य झाला का, हा खरा प्रश्न आहे. विरोधकांनी वारंवार भ्रष्टाचारविरोधी कारवायांवर आक्षेप घेतला आणि तरीही हेच लोक भ्रष्टाचाराच्या नावे गळे काढताना दिसले, ही बाब देशहिताच्या दृष्टीने खूपच घातक आहे. पेपरफुटीसारख्या भ्रष्टाचारावर प्रहार करण्यासाठी केंद्र सरकारने फास्ट ट्रॅक न्यायालयांचा निर्णय जाहीर केला. शिवाय मोठा दंड आणि कठोर शिक्षेची तरतूद केली. अशा प्रकारच्या न्यायालयांमुळे आरोपींना पुरावे नष्ट करण्यासाठी कमी वेळ मिळेल आणि पर्यायाने त्यांना शिक्षा देणे शक्य होईल. ही बाब खरी असली तरी अशा प्रकरणांमध्ये आजही ४२०, ४६७ आणि ४६८ यासारखी सामान्य कलमे लावली जातात. अँटी पेपर लीक कायद्यात सुधारणा करून कठोर विधेयक आणण्याची घोषणा करण्यात आली. हे कायदे पारित होण्यासाठी आणखी काही काळ लागणार आहे. फास्ट ट्रॅक न्यायालये हा भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढ्यातील एक महत्त्वाचा मार्ग आहे. परंतु, हा मार्ग एकमेव उपाय नाही. यासाठी तपास यंत्रणांची कार्यक्षमता आणि प्रशासकीय पारदर्शकता अत्यंत आवश्यक आहे. सरकारने आपली भूमिका कितीही स्वच्छ ठेवली तरी योजना राबविणारे प्रशासन अकार्यक्षम व भ्रष्टाचारी असेल तर मूळ हेतू साध्य होऊ शकत नाही. भारतीय कायदे सौम्य आहेत. १० गुन्हेगार सुटले तरी चालेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा नको, अशी तरतूद आपल्याकडे आहे. कायद्यांच्या या पळवाटांचा फायदा गुन्हेगार घेतात आणि पुन्हा नव्याने गुन्हे करण्यासाठी सज्ज होतात.



सीबीआयकडील तब्बल ७ हजारांहून अधिक भ्रष्टाचाराचे खटले विविध न्यायालयांमध्ये धूळ खात पडून आहे. यातील अनेक खटले २० वर्षांपेक्षाही जुने आहे. भ्रष्टाचारासाठी गरिबी हे प्रमुख कारण मानले जाते. परंतु, ही बाब पूर्ण सत्य नाही. अज्ञान, देशविरोधी मानसिकता आणि स्वार्थीपणा ही तीन कारणे भ्रष्टाचारासाठी पोषक ठरतात. न्याय देणारी व्यवस्थाही भ्रष्टाचारी नसल्याचा दावा ठामपणे करता येत नाही. ही व्यवस्थाच भ्रष्टाचारी असेल तर सर्वसामान्यांना न्याय कसा मिळणार?

देश सर्वच आघाड्यांवर वेगाने मार्गस्थ झाला आहे. देशात संशोधक आणि बुद्धिवंतांच्या खाणी आहेत. परंतु, देशाला पाण्यात पाहणाऱ्यांची संख्यासुद्धा कमी नसल्याने देश आजही भ्रष्टाचाराच्या आगीत होरपळत आहे. कोट्यवधींची संपत्ती बाळगणारे अथवा लाखो रुपये पगार कमावणारे जेव्हा एखाद्या गरिबाला पाच-दहा हजारांची लाच मागतात तेव्हा माणुसकी पूर्णतः गळून पडते. ही व्यवस्था बदलावीच लागेल. त्याशिवाय समृद्ध आणि संपन्न भारताची व्याख्या पूर्ण होऊ शकत नाही. ■

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# माहितीच्या युगात गुरूचे स्थान

**''गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥''**

भारतीय संस्कृतीमध्ये गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ स्थान देण्यात आले आहे. कारण देव आपल्याला जीवन देतो; परंतु त्या जीवनाला दिशा देण्याचे कार्य गुरू करतो. म्हणूनच आषाढ पौर्णिमेला साजरी होणारी गुरुपौर्णिमा ही केवळ धार्मिक परंपरा नसून भारतीय ज्ञानपरंपरेचा, कृतज्ञतेचा आणि संस्कारांचा उत्सव आहे.

पूर्वी व्यक्तीला ज्ञान देण्याचे काम गुरू करत असे. ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला, खेळ, युद्धशास्त्र, अध्यात्म अशा जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये गुरूचे स्थान सर्वोच्च होते. गुरुकुलात शिक्षण म्हणजे केवळ अक्षरज्ञान नव्हते; तर चारित्र्यनिर्माण, संयम, कर्तव्य, आत्मविश्वास, विवेक आणि राष्ट्रनिष्ठा यांचे संस्कार केले जात होते. म्हणूनच भारताने वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र अशा असंख्य ज्ञानशाखा जगाला दिल्या.

परंतु काळ बदलला. शिक्षणाचे बाजारीकरण झाले. शिक्षण ही साधना न राहता सेवा आणि नंतर व्यवसाय बनला. गुरूंची आवश्यकता अनेकांच्या दृष्टीने फक्त परीक्षा पास होईपर्यंत मर्यादित राहिली. ''आम्ही फी भरतो, म्हणजे शिक्षण विकत घेतो,'' अशी पालकांची मानसिकता झाली. शिक्षकांवरही निकालाचा दबाव वाढला. विद्यार्थ्यांमध्ये कष्ट, जिज्ञासा आणि स्वाध्यायाची वृत्ती कमी होत गेली. पूर्वी एखादा छोटासा संदर्भ शोधण्यासाठी अनेक पुस्तके पालथी घालावी लागत होती. आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि चॅटजीपीटी काही सेकंदांत हजारो पानांची माहिती आपल्या समोर आणतात.



याच ठिकाणी एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे चॅटजीपीटी किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता गुरूची जागा घेऊ शकते का? तर याचे उत्तर आहे, नाही.

कृत्रिम बुद्धिमत्ता माहिती देऊ शकते; परंतु गुरू ज्ञान देतो. माहिती आणि ज्ञान यांच्यातील फरक समजून घेतला पाहिजे. माहिती सर्वांसाठी सारखी असते; पण ज्ञान प्रत्येकाच्या परिस्थितीनुसार बदलते. महाभारतातील द्रोणाचार्यांचे उदाहरण यासाठी अत्यंत बोलके आहे. द्रोणाचार्यांनी शंभर कौरव आणि पाच पांडव यांना विविध शस्त्रविद्या शिकवल्या. त्यांच्या व्यतिरिक्त अनेक राजकुमारही होते. परंतु ब्रह्मास्त्रासारखी दिव्य विद्या त्यांनी केवळ अर्जुन आणि अश्वत्थामा यांनाच दिली. कारण प्रत्येक ज्ञान प्रत्येकाला देण्यासारखे नसते. ग्रहण करण्यासाठी शिष्यामध्येही शारीरिक, बौद्धिक, मानसिक योग्यता असावी लागते. महाभारताच्या युद्धाच्या शेवटी अर्जुन आणि अश्वत्थामा यांनी एकमेकांवर ब्रह्मास्त्र सोडले. महर्षी व्यासांनी दोघांनाही ते परत घेण्यास सांगितले. अर्जुनाने गुरूंच्या शिकवणीचा आणि आत्मसंयमाचा परिचय देत ब्रह्मास्त्र परत घेतले; परंतु अश्वत्थाम्याला ते शक्य झाले नाही. शेवटी त्याने ते उत्तरेच्या गर्भावर सोडले. या प्रसंगातून स्पष्ट होते की, विद्या देणे पुरेसे नसते; त्या विद्येचा योग्य वेळी आणि योग्य प्रकारे उपयोग करण्याचा विवेक देणे अधिक महत्त्वाचे असते. तो विवेक गुरू देतो.

आजच्या जगाकडे पाहिले, तर हे सत्य अधिक स्पष्ट होते. अनेक देशांकडे अण्वस्त्रे आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता अण्वस्त्रांचे लक्ष्य अचूक ठरवू शकते, युद्धाची रणनीती आखू शकते; परंतु अण्वस्त्रांचा वापर करायचा की नाही, हा नैतिक निर्णय कृत्रिम बुद्धिमत्ता घेऊ शकत नाही. विवेक, संयम आणि मानवतेची जाणीव कोणत्याही संगणकात निर्माण करता येत नाही. ती गुरूच्या संस्कारातूनच निर्माण होते.

आज प्रत्येक क्षेत्रात अनेक अर्जुन उभे आहेत. करीअर, स्पर्धा, पैसा, नैराश्य, व्यसन, कौटुंबिक तणाव आणि सामाजिक माध्यमांच्या आभासी जगात अनेक युवक संभ्रमित झाले आहेत. त्यांना माहितीची कमतरता नाही; परंतु योग्य मार्गदर्शनाची कमतरता आहे. म्हणून आज समाजाला पूर्वीपेक्षा अधिक गुरूंची आवश्यकता आहे. आपल्या देशाचे नाव 'भारत' आहे. 'भा' म्हणजे ज्ञान आणि 'रत' म्हणजे त्यात रमणारा. ज्ञानामध्ये रमणाऱ्या लोकांचा हा देश आहे. म्हणूनच भारताला जगद्‌गुरू म्हणण्याची परंपरा निर्माण झाली. भारत जगद्‌गुरू होईल तो केवळ आर्थिक किंवा लष्करी सामर्थ्यामुळे नव्हे; तर जगाला विवेक, अध्यात्म, करुणा, सहअस्तित्व आणि मानवतेचा मार्ग दाखविण्याच्या क्षमतेमुळे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि समर्थ रामदासांनी गुरूचे माहात्म्य सांगितले आहे. गुरुपौर्णिमा हा केवळ पूजा करण्याचा दिवस नाही; तर आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या गुरूंच्या शिकवणीप्रमाणे आचरण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

आज प्रत्येकाने मनोमन एवढेच म्हणावे -

''भक्ती व्हावे श्रीगुरुची, मी पूजा बांधिली.''

गुरूंबद्दलची श्रद्धा, कृतज्ञता आणि नम्रता जिवंत असेल, तरच ज्ञानाचे सामर्थ्य मानवतेच्या कल्याणासाठी वापरले जाईल. आणि तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने पुन्हा एकदा 'जगद्‌गुरू' म्हणून उभा राहील. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### कॉमेडीची ट्रॅजेडी

बिर्याणी हा मांसाहार करणाऱ्यांसाठी अत्यंत आवडता पदार्थ आहे, पण सध्या गाजत असलेल्या ३७० रुपयांच्या बिर्याणीच्या वादामुळे स्टॅण्ड-अप कॉमेडियन प्रणीत मोरे यांच्या तोंडाला चांगलाच फेस आणला आहे. प्रणीतच्या लाईव्ह शोदरम्यान, प्रेक्षकांमधील एका व्यक्तीने त्याच्या डेटचा अनुभव सांगितला; मैत्रिणीला ३७० रुपयांची बिर्याणी ऑफर करून त्याबदल्यात अनैतिक अपेक्षा करण्याची भावना त्याने तिच्यासमोर व्यक्त केली. असे करून त्याने आपली विकृत मानसिकता समोर आणली. आपल्याच मैत्रिणीवर आक्षेपार्ह टिप्पणी करून तिचा अपमान केला आणि त्याच्या या वक्तव्यावर आयोजकाने त्याला थांबवण्याऐवजी स्वतः सुद्धा या संवादात सहभागी होऊन आपली वैचारिक पातळी दाखवली. एखाद्या मुलीवर पैसे खर्च करून त्याबदल्यात आपण काहीही मागणी करू शकतो, अशी मानसिकता त्या व्यक्तीची होती जी अत्यंत दुर्दैवी आहे. या प्रकरणाची दखल महिला आयोगाने घेतली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. प्रणीत मोरेने या प्रकरणात माफी जरी मागितली असली तरीसुद्धा त्याने आपली जबाबदारी पूर्णपणे दुर्लक्षित केली यात शंका नाही. विनोद म्हणजे अश्लील आणि शिवराळ भाषा, अशीच व्याख्या यांनी केलेली दिसते. समय रैना, रणवीर अलहबादिया आणि प्रणीत मोरे हे आपल्यासमोर त्याचे उदाहरण म्हणावे लागेल; असे असूनही शुद्ध भाषेत अगदी निखळ विनोद करून प्रेक्षकांना हसवणारे स्टॅण्ड-अप कॉमेडियन आहेत. विनोद आणि अश्लीलता यांच्यात एक सूक्ष्म सीमारेषा असते. तेव्हा स्वतःची कला सादर करताना याची जाणीव ठेवून आपल्या बोलण्याने आणि वर्तनाने सामाजिक मर्यादा आपण ओलांडत नाही ना, याचे भान प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे.

**पूजा सोमलवार**/८२०८३४९४५१

■■

### उत्सवात देवाचा चेहरा दिसू द्या

देवशयनी एकादशीपासून धार्मिक उत्सवाला घरोघरी तसेच मंदिरात सुरुवात होते. भक्तांमध्ये नवचैतन्य आणि उत्साह संचारतो. तो पुढे वर्षभर कायम राहतो. मंदिरांमध्ये भाविकांची प्रचंड गर्दी असते. तेथे देवाला खूप हार, फूल व इतर साहित्य अर्पण केले जातात. त्यामुळे अनेक मंदिरात देवाचा चेहरा पूर्णपणे दिसत नाही. शेगावच्या मंदिरात गजानन महाराजांची मूर्ती स्पष्टपणे भाविकांना दिसते व तेथे मूर्ती-दर्शनाचा वेगळाच आनंद प्राप्त होतो. तीच प्रथा सर्व मंदिरांनी सुरू करावी. म्हणजे मंदिरात जाऊन देवदर्शनाचा लाभ सगळ्यांना घेता येईल.



**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

### कोकणालाच आरक्षणाचा तुटवडा का?

आषाढी वारीसाठी देशाच्या आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी रेल्वे, एसटी आणि खाजगी वाहनांनी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. रेल्वेने आणि बसने प्रवास करणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड असली, तरी पंढरपूरकडे जाणाऱ्या रेल्वे किंवा बसच्या आरक्षणाबाबत दरवर्षी मोठा गोंधळ किंवा काही मिनिटांत सर्व जागा संपल्याच्या घटना सहसा ऐकायला मिळत नाहीत. तसेच त्या मार्गावरील वाहतूक व्यवस्थेवरही इतका ताण जाणवत नाही. याउलट, गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या रेल्वेचे आरक्षण सुरू होताच अवघ्या काही मिनिटांत सर्व जागा भरल्याचे चित्र दरवर्षी दिसते. त्यानंतर हजारो प्रवाशांना प्रतीक्षा यादी, तिकिटासाठी होणारी धावपळ, खडतर एसटी प्रवास, खराब रस्ते आणि अतिरिक्त खर्च यांचा सामना करावा लागतो. आश्चर्याची बाब म्हणजे, पंढरपूरला देशभरातून लाखो भाविक येतात; तर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणारे प्रवासी प्रामुख्याने कोकणातीलच असतात. असे असतानाही पंढरपूरच्या तुलनेत कोकण रेल्वेचे आरक्षण काही मिनिटांत कसे संपते? दरवर्षी अशीच परिस्थिती निर्माण होत असेल, तर त्यामागे तांत्रिक त्रुटी, मोठ्या प्रमाणावर होणारे एजंट बुकिंग, तिकिटाचा गैरवापर किंवा इतर कोणतेही कारण आहे का, याची सखोल चौकशी रेल्वे प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी करणे गरजेचे आहे. जर प्रवाशांची फसवणूक करणारे किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणारे कोणतेही जाळे कार्यरत असेल, तर त्याचा शोध घेऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. गणेशोत्सव हा कोकणवासीयांच्या श्रद्धेचा आणि कुटुंबाच्या एकत्र येण्याचा सण आहे. त्यामुळे या काळात रेल्वे आणि परिवहन व्यवस्थेने प्रवाशांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि न्याय्य सेवा देणे ही सरकारची जबाबदारी आहे. ■

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त...


## आरोही गाडेकरचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ जुलै : शासनाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत पटेल नगर येथील राजर्षी शाहू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. वर्गशिक्षक वर्षा दैठणकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी केलेल्या सुयोग्य नियोजनानुसार शाळेत शिष्यवृत्ती परीक्षार्थींची तयारी करण्यात आली होती. तसेच सरस्वती केंद्रे व सुरेखा भुरे मॅडमचे गणित व मराठी विषयात महत्वाचे योगदान लाभले. या परीक्षेचा दिनांक २५ जुलै रोजी निकाल जाहीर झाला असून शाळेतील विद्यार्थी कु. आरोही महेश गाडेकर १३२ गुण घेऊन शिष्यवृत्तीस पात्र ठरली आहे. आरोहीला शिष्यवृत्ती परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष उद्धवराव जाधव, सचिव ललिता जाधव, मुख्याध्यापक विकास तोडकर, वर्गशिक्षक वर्षा दैठणकर तसेच शाळेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## महादेव खंडागळे यांची निवड



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ जुलै : कोयना रोड येथील सार्वजनिक गणेश मंदिर या ठिकाणी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ३२ वा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्या निमित्ताने वार्षिक उत्सव समिती सर्वानुमते निवड मावळते अध्यक्ष यशपाल कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. या उत्सव समितीचे अध्यक्ष म्हणून महादेव खंडागळे, उपाध्यक्ष यशपाल सोनवणे, कार्याध्यक्ष मंगेश सोनकांबळे, सचिव सुरेश शिंदे, कोषाध्यक्ष संजय क्षीरसागर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तरी या आगामी काळात होणाऱ्या सप्ताहाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर सचिव नामदेवराव इगे यांनी केले आहे.

## राजर्षी शाहू प्राथमिक विद्यालयात वारकरी दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात माऊलीचा गजर



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २७ जुलै : आषाढी एकादशीचे औचित्य साधून पटेल नगर येथील राजर्षी शाहू प्राथमिक विद्यालयाचा वारकरी दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विकास तोडकर यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पालखीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेतील शिक्षक संजय कुमार बेलुरे, गोविंद मुस्कावाड, निवृत्ती जाधव, सरस्वती केंद्रे, वर्षा दैठणकर, सारिका गडकर, सुरेखा भुरे सह विद्यार्थी वारकरी वेशभूषेत उपस्थित होते. अत्यंत भक्तीपूर्ण वातावरणात दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, विठ्ठल-रुक्मिणी आदींची वेशभूषा साकारून टाळ-मृदुंगाच्या गजरात व विठ्ठल नामाच्या जयघोषात शाळा परिसरातून दिंडी काढली. जरा अलीकडे ये, मला पलीकडे ने पांडुरंगा... नदी भरली चंद्रभागा या गीतावर विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य विशेष आकर्षण ठरले. पालखी पूजन, रिंगण सोहळा आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जगत् जागृती शिक्षण प्रसारक मंडळ चाकूरच्या संचालक मंडळाच्या छायाचित्र फलकाचे उद्घाटन



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २७ जुलै : जगत् जागृती शिक्षण प्रसारक मंडळ चाकुर येथील संस्थापक संचालक मंडळाच्या छायाचित्र फलकाचे उध्दघाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी जगत जागृती शिक्षण शिक्षण प्रसारक मंडळ चाकूरच्या वतीने नामदार बाबासाहेब पाटील यांचा सत्कार युवा उद्योजक करण नरेशजी पाटील चाकूरकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्याचबरोबर चाकूर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष भागवत फुले , जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे , जिल्हा परिषद सदस्य उषाताई सोनकांबळे पंचायत समिती उपसभापती भुजंगराव शिंदे,चापोलीचे सरपंच भालचंद्र चाटे यांचाही याप्रसंगी संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार कदम यांनी केले.

याप्रसंगी जगत् जागृती शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नरेश पाटील चाकूरकर ,अध्यक्ष सर्वोत्तमराव कुलकर्णी, उपाध्यक्ष अर्जुन मद्रेवार, सहसचिव बाबुराव बिडवे, कोषाध्यक्ष धोंडीराम तोंडारे ,संस्थेचे सन्माननीय सदस्य शिवप्रसाद शेटे, ॲड. सुधाकरराव मोतीपवळे, ॲड.विक्रम पाटील चाकूरकर, विठ्ठलराव सोनटक्के, महादेव काळोजी, राजकुमार कदम, जगत् जागृती विद्या मंदिर चाकूरचे मुख्याध्यापक संजय नारागुडे, पर्यवेक्षक प्रदीप ऊस्तुर्गे, जगत् जागृती प्राथमिकचे मुख्याध्यापक महादेव काळोजी आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिक्षकामुळेच गुणवंत विद्यार्थी, आदर्श समाज निर्माण होतो : आ. स्वामी

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २७ जुलै : येथील मोरया लॉन्स येथे माजी सरपंच कै. नागनाथप्पा मठपती सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष बसवराज मठपती यांच्या संकल्पनेतून शिरूर अनंतपाळ शहर व तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षक तसेच इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार प्रवीण स्वामी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रवीण स्वामी म्हणाले की, शिक्षणातून संस्कार घडणे अपेक्षित असते आणि त्याच संस्कारांतून पुढे सुजाण समाजाची निर्मिती होत असते. मात्र, गुणवंत समाज घडवण्याऐवजी आजची शिक्षणपद्धती केवळ 'गुणधारक' विद्यार्थी घडवत असल्याचे चित्र मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व केवळ एका उद्दिष्टासाठीच्या स्पर्धेपुरते मर्यादित राहिले आहे.

ते पुढे म्हणाले की, शिक्षणातील गुणवत्ता सातत्याने ढासळत असून ग्रामीण भागातील पालक आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी शहरांकडे वळत आहेत. मात्र, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शिक्षकांनी आपल्या उत्तम अध्यापनातून आणि योग्य मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना घवघवीत यश मिळवून दिले आहे. विद्यार्थ्यांचे यश ही शिक्षकांच्या कार्याची खरी पावती असून देशाच्या जडणघडणीत आणि प्रगतीत शिक्षक हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांनी पुढील काळातही समाजनिर्मितीसाठी आपले योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करत आमदार स्वामी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर मोठी उंची गाठावी तसेच आपल्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे गुरुजन आणि आई-वडिलांचे कायम स्मरण ठेवून आदर्श नागरिक बनण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन केले.

## दुष्काळाच्या विळख्यात डिगोळचे शेतकरी

### वारंवार मशागत, चारा व पाण्याच्या संकटाने वाढली चिंता



तभा वृत्तसेवा

डिगोळ दि. २७ जुलै : (ता. शिरूर अनंतपाळ) तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने डिगोळ येथील शेतकरी मोठ्या आर्थिक आणि मानसिक संकटात सापडले आहेत. गावातील तरुण शेतकरी शिवहार कोठे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांसमोर शेताची मशागत किती वेळा करायची? हा मोठा प्रश्न उभा राहिला आहे.

पेरणीयोग्य पाऊस अद्याप झालेला नसल्याने शेतकऱ्यांना पेरणी करता आलेली नाही. मात्र अधूनमधून पडणाऱ्या किरकोळ पावसामुळे शेतामध्ये तण मोठ्या प्रमाणात उगवत आहे. त्यामुळे पेरणीपूर्वी पुन्हा ट्रॅक्टरने मशागत करून शेत तयार ठेवणे भाग पडत आहे. प्रत्येक वेळी ट्रॅक्टरची पाळी घालण्यासाठी हजारो रुपयांचा अतिरिक्त खर्च होत असून, हा खर्च शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जाऊ लागला आहे.

दुसरीकडे जनावरांच्या चाऱ्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आतापर्यंत उपलब्ध असलेल्या चाऱ्यावर कशीबशी व्यवस्था करण्यात आली; मात्र आता तोही संपुष्टात आला आहे. त्यामुळे गुरांसाठी चारा कोठून आणायचा, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.यासोबतच पाण्याची टंचाईही तीव्र झाली आहे. शेतात उपलब्ध असलेले पाणीही संपल्याने जनावरांना पाणी कसे द्यायचे, तसेच शेतात ठेवलेली गुरे आता घरी आणावीत की शेतातच ठेवावीत, अशा अनेक प्रश्नांनी शेतकरी हवालदिल झाले आहेत.

डिगोळ परिसरातील अनेक शेतकरी सध्या अशाच संकटांचा सामना करत असून, लवकरात लवकर समाधानकारक पाऊस पडून पेरणीला सुरुवात व्हावी, अशी अपेक्षा ते व्यक्त करत आहेत. परिस्थिती अशीच कायम राहिल्यास शेतीबरोबरच पशुपालनालाही मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## किल्लारीत दिव्यांग संसाधन कक्षाचे उद्घाटन

### १४ दिव्यांग विद्यार्थ्यांना सहाय्यक साहित्याचे वितरण



तभा वृत्तसेवा

औसा दि.२७ जुलै : समग्र शिक्षा अभियानांतर्गत समावेशित शिक्षण अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने गटसाधन केंद्र, पंचायत समिती औसा यांच्या वतीने मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त पी.एम. श्री. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा किल्लारी येथे दिव्यांग संसाधन कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

याचबरोबर केंद्रातील विविध शाळांतील १४ दिव्यांग विद्यार्थ्यांना कमोड चेअर, व्हीलचेअर, श्रवणयंत्र, चष्मे, मोठ्या अक्षरातील पुस्तके (लार्ज प्रिंट), पांढरी काठी तसेच लेखन-वाचनासाठी आवश्यक विविध सहाय्यक साहित्याचे वितरण करण्यात आले.

शालेय समितीचे अध्यक्ष खंडू घोडके कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशिक्षित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.तर गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळदाते, शिक्षण विस्तार अधिकारी सी.एम.शेख,एक.के.शेख, केंद्र प्रमुख मुरलीधर शिंदे, विशेष शिक्षक संघटनेचे नेते सचिन वळके पाटील,भागवत जगताप, मुख्याध्यापक चंद्रहंस पाटील, व्यवस्थापन समिती घ्या उपाध्यक्षा अंजली कुंभार, शिवाजी विद्यालयाचे संचालक रमेश हेळंबे, वैजनाथ कांबळे, चंद्रकांत बाभळसुरे,माधव भोसले, राजाभाऊ जळकोटे, नामदेव माळवदे,बिसरसिंग ठाकूर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच क्रिएटिव्ह संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना शालेय दप्तर व वह्यांचे वाटप करण्यात आले. जनऔषधी वैद्यकशास्त्र विभाग, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथील डॉ. शुभांगी बेंबडे व त्यांच्या चमूने दिव्यांग विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून शालेय विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

यावेळी अरफिया समीर मुलाणी या दिव्यांग विद्यार्थिनीने मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मनोगत व्यक्त करून उपस्थितांची मने जिंकली. दिगांबर गावकरे सुमित्रा दिवे, माधव गोरे, अनिरुद्ध वाघमारे, सुभाष चिने, देवानंद सोनकांबळे, संदीप जाधव, मंगेश देशमुख, रघुनाथ कराड, अंगद महानुरे, हनुमंत भासिंगे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी पणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला होता. व्यंकट सानप यांनी सुत्र संचालन केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक चंद्रहंस पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## सुप्रियाताई भालेराव यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २७ जुलै : एकल पालकांच्या मुलींना ग्रामीण विकास लोकसंसंस्थाच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी नगरसेविका सुप्रियाताई चंद्रशेखर भालेराव यांनी उपस्थित मुलींशी संवाद साधत त्यांचे मनोधैर्य वाढवत त्यांना प्रोत्साहित केले.

क्रमिक पुस्तके, ड्रेस, नोटबुक्स, छत्री, कलर्स, कंपास, स्टेशनरी, स्कूल बॅग, पाणी बॉटल प्रॅक्टिकल बुक यासह शाळेत लागणाऱ्या आवश्यक वस्तू व शालेय साहित्य संस्थेच्या वतीने समाजातील काहीं दानशूर व्यक्तींच्या मदतीने देण्यात येते . अहमदपूर नगर परिषद सदस्य सौ सुप्रियाताई चंद्रशेखर भालेराव यांचें हस्ते उपस्थित मुलींना शिक्षण उपयोगी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष मच्छिंद्र गोजमे समन्वयक मंगलताई श्रीमंगले यांच्यासह विद्यार्थिनी, माता पालक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



तभा वृत्तसेवा

शिरुर अनंतपाळ दि. २७ जुलै : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष. तथा माजी अध्यक्ष. जि.प. लातुर अशोकराव शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमीत्त प्रतिवर्षाप्रमाणे शिरुर अनंतपाळ तालुक्यात व शहरात ग्रामदैवत. अनंतपाळ मंदिरास दुग्धाभिषेक, भटक्या विमुक्त मसनजोगी समाजातील विद्यार्थ्याना शालेय साहित्य वाटप, सार्वजनिक लिंगायत स्मशानभुमी,दलित स्मशानभुमी,जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण,ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना फळ वाटप, जिल्हा परिषद शाळेतील २१०० विद्यार्थ्याना शालेय साहित्य वाटप,आशा कार्यकर्ती,अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, नगरपंचायत स्वच्छता महिला कर्मचारी यांना साड्या वाटप असे विवीध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करुन वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात येणार आहे..

असे शिरुर अनंतपाळ तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाअध्यक्ष. आबासाहेब पाटील उजेडकर, शहराअध्यक्ष. अशोक कोरे व नगरसेवक. सुधीर लखनगावे यांनी कळविले आहे.

## भारतीय जनता पक्षाच्या अहमदपूर शहराध्यक्ष पदी गोविंद गिरी



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २७ जुलै : गेल्या काही महिन्यांपासून बहुचर्चित असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या अहमदपूर शहराध्यक्ष पदी गोविंद गिरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी ग्राम विकास मंत्री तथा लातूर जिल्हा भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष आमदार बसवराज पाटील यांच्या हस्ते गोविंद गिरी यांना शहराध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी माजी आमदार बब्रुवान खंदाडे उपस्थित होते.

अहमदपूर शहरात पक्ष संघटन वाढविण्यासाठी जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी गोविंद गिरी यांना शुभेच्छा दिल्या. गोविंद गिरी यांना या अगोदर आमदार रमेश अप्पा कराड व दिलीपराव देशमुख यांच्या जिल्हा अध्यक्षांच्या कार्यकाळात दोन टर्म भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून यशस्वी पणे कार्य केले आहे. सदरील कामाची दखल घेऊन पक्षाने गोविंद गिरी यांना अहमदपूर शहराचे शहराध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.

गोविंद गिरी यांचा अहमदपूर शहरासह तालुक्यात मोठा जनसंपर्क असुन पूर्ण वेळ पक्ष कार्यासाठी अहोरात्र मेहणत घेणारा, सर्वसमावेशक कार्यकर्ता म्हणून गोविंद गिरी यांची ओळख आहे. सदरील निवडीबद्दल भारतीय जनता पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या सह सर्व स्तरातून गोविंद गिरी यांचे अभिनंदन होत आहे.

## यशवंत विद्यालयात हरिनामाचा गजर, 'एक मूल, एक वृक्ष' संदेशातून पर्यावरणाचा जागर



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २७ जुलै : येथील यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शहरातून आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन केले होते .आषाढी एकादशीच्या पार्श्र्वभूमीवर विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषात आणि हरिनामाच्या गझरात निघालेल्या या दिंडीने संपूर्ण अहमदपूर शहर भक्तीमय करून सोडले. या धार्मिक उत्सवाला सामाजिक व पर्यावरणाची जोड देत विद्यार्थ्यांनी एक आदर्श उपक्रम राबवला.

या दिंडीदरम्यान पर्यावरण संवर्धनाचा मोठा संदेश देण्यात आला. विद्यालयातर्फे 'एक मूल, एक वृक्ष' या संकल्पनेचा प्रसार करत विद्यार्थ्यांना २०० वृक्षांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी हातात लहान रोपे घेऊन, पारंपरिक पोशाख परिधान करत आणि टाळ-मृदंगाच्या तालावर ठेका धरत शहरात पर्यावरणाचा जागर केला.

या प्रसंगी विद्यालयाचे शिक्षक, शिक्षिका, मुख्याध्यापक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. पारंपारिक वारकरी वेशभूषेत सजलेली मुले, हातात घेतलेले पर्यावरण संदेशाचे फलक आणि वृक्ष संवर्धानाचा दिलेला संदेश यामुळे या आगळ्यावेगळ्या दिंडीचे अहमदपूर शहरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. प्रत्येकाने आपल्या वाढदिवसाला किंवा विशेष प्रसंगी एक झाड लावून ते जगवावे, असे आवाहन यावेळी विद्यालयाच्या वतीने करण्यात आले.

या दिंडीच्या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन शिंदे, रोटरीचे डिस्ट्रिक्ट पर्यावरण डायरेक्टर अनिल चवळे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक शिवाजी सूर्यवंशी सांस्कृतिक विभाग प्रमुख कपिल बिरादार सुनील स्वामी धनंजय तोकले संतोष पारशेट्टे, विजय वाडकर, सचिन लांडगे श्रीधर लोहारे मनोहर ढेले, अजमुद्दीन टेकर, विजया स्वामी सविता झोळगीकर, वर्षा राणी कांबळे, सुनीता गीत्ते, सोनल नानापुरे, अश्रिवनी बोरोळे, योजना बिरादार , सोमवंशी मॅडम , गोगुरुवार मॅडम यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हाधिकारी कार्यालयात कारगिल विजय दिनानिमित्त वीरांच्या शौर्याला अभिवादन



**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात २७ वा कारगिल विजय दिवस कृतज्ञतापूर्वक साजरा करण्यात आला. यावेळी कारगिल युद्धातील शहीद जवानांना अभिवादन करून त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह शहीद जवानांचे कुटुंबीय, माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी आणि शहीद जवान यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शहीद जवानांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व शहीद कुटुंबीयांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी माजी सैनिकांनी आपल्या भावना व्यक्त करताना देशसेवेच्या आठवणींना उजाळा दिला. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी कारगिल विजय दिवसाचे महत्त्व अधोरेखित करत माजी सैनिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले. निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अनुराधा ढालकरी यांनीही माजी सैनिकांच्या योगदानाचा गौरव केला.

याप्रसंगी सामाजिक क्षेत्रातील कार्य आणि माजी सैनिकांसाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सुभेदार विश्वनाथ सातपुते यांना प्राप्त झालेल्या सैनिक रत्न पुरस्काराबद्दल त्यांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी वरिष्ठ लिपिक अनंत ओगले, कल्याण संघटक हरीभाऊ माने, लिपिक गणपत संसारे, दिलीप ससाणे उपस्थित होते.

### बोरवंड बुद्रुक येथे आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडीद्वारे पर्यावरण जनजागृती

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोरवंड बुद्रुक येथे आषाढी एकादशीनिमित्त पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेसोबतच वृक्षसंवर्धनाचा संदेश देत पर्यावरण जनजागृती केली.

दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान केली होती. तसेच विविध वृक्षांचे प्रतीकात्मक सादरीकरण करत गावातून वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षारोपण करा, पर्यावरण वाचवा, निसर्गाचे रक्षण करा अशा घोषणांद्वारे विद्यार्थ्यांनी शालेय विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण केली. या उपक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत दिंडीत सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या पर्यावरणपूरक संदेशाचे उपस्थितांनी कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कब मास्टर रामकिशन भोसले, सहाय्यक कब मास्टर खोबराजी वाळवटे, दिलीप हिप्पर, फारूखपाशा सय्यद, पूजा तोटे आणि प्रदीप उंडाळकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमाचे केंद्रप्रमुख संतोष दराडे (शिंगणापूर), विस्तार अधिकारी मंगेश नरवाडे आणि गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत यांनी कौतुक करत विद्यार्थी आणि शिक्षकांचे अभिनंदन केले. वारकरी परंपरा आणि पर्यावरण संरक्षणाचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

### शारदा महाविद्यालयात तलाठी व लिपीक परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन केंद्र ३ ऑगस्टपासून वर्गांना प्रारंभ



**परभणी,/प्रतिनिधी :** येथील शारदा महाविद्यालयातील हेमराजजी जैन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि ज्ञानदा अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) व लिपीक पदांच्या स्पर्धा परीक्षांसाठी मोफत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

तलाठी व लिपीक भरतीसाठी शासनाने सुमारे पाच हजार पदांची जाहिरात प्रसिद्ध केली असून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही महत्त्वाची संधी आहे. या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ५ ऑगस्ट असून परीक्षा २५ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

या पार्श्वभूमीवर शारदा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन पवार यांच्या पुढाकारातून परभणी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन, अद्ययावत ग्रंथालय, सुसज्ज अभ्यासिका तसेच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक संदर्भग्रंथांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मार्गदर्शन वर्गांना ३ ऑगस्टपासून शारदा महाविद्यालयातील हेमराजजी जैन सभागृहात प्रारंभ होणार आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवेश व अधिक माहितीसाठी प्रा. अशोक चोपडे (९८५०११६७३३) किंवा प्रा. डॉ. प्रशांत मेने (९४२१३९२१३०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष नाकाडे, डॉ. सुरेश खिस्ते, डॉ. नितीन बावळे, डॉ. नवनाथ सिंगापूरे आणि डॉ. सचिन खडके यांनी केले आहे.

# कपाशीवरील निष्क्रिय तणनाशक बाजारात!

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी:-** सध्या कपाशीच्या पिकांमध्ये मोठ्या प्रमाणात तण वाढले आहे. त्यासाठी बाजारात वेगवेगळ्या कंपन्यांचे तणनाशक उपलब्ध झाले असून विलवूड कंपनीचे बोगस तणनाशक सोनपेठ येथील कृषी केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांना विक्री केले जात आहे.सदरच्या तणनाशक चा कपाशीतील तन मारण्यासाठी कुठलाही उपयोग होत नसल्याने शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री लागून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत असल्याचे दिसून येत आहे.

सध्या सोनपेठ तालुक्यातील रिमझिम पावसामुळे सर्वच पिकांमध्ये मोठ्या प्रमाणात तनाची जोमाने वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यासाठी विविध पिकातील तणनाशकाच्या फवारणीचा वापर शेतकरी करत आहेत. त्यातच कपाशी पिकामधील तन मारण्यासाठी तणनाशकाच्या शोधात शेतकरी कृषी केंद्राकडे धाव घेत आहेत. यावेळी तालुक्यातील धार डिघोळ येथील बाबासाहेब गर्जे या शेतकऱ्यांनी आपल्या कपाशी पिकामधील तण नष्ट करण्यासाठी शहरातील श्री धनलक्ष्मी कृषी केंद्राकडे योग्य तन नाशकची विचरना केली. त्यावेळी संबंधित कृषी केंद्र चालकांकडून त्यांना विलवूड कंपनीचे दोन तन नाशक देण्यात आले. नाशकाचे फवारणीने कपाशी मधील सर्व प्रकारचे तन नष्ट होत असल्याची हानी

**धनलक्ष्मी कृषी केंद्रावरुन घेतलेले विलवूडचे औषध बोगस**

कृषी केंद्र चालकाने दिली. त्या तणनाशकापैकी एक इंडोमिन्स आणि दुसरे विल हीट. हे दोन तन नाशक देण्यात आले. सदरील दोन्ही तणनाशक औषधं एकाच कंपनीचे असून, एक हेक्टर कपाशीवरील तणनाशक फवारणीसाठी ३००० रुपयांची औषधी घेतली.फवारणी करून वीस दिवसांचा कालावधी लोटला तरीही शेतीतील तन यत्किंचितही मरत नसल्यामुळे शेतकऱ्याचे कपाशीचे पीक तणाचे विळख्यात सापडले. सदरच्या तणनाशक औषधीची फवारणी करुन एक टक्काही तण नष्ट झाले नाही. त्यामुळे शेतकऱ्याला आर्थिक नुकसानीचा मोठा फटका बसला.तसेच तणनाशक फवारणी मुळे आज उद्या तण नष्ट होईल याची वाट पाहत शेतीतील तणाची मोठ्या प्रमाणात वाढ झाली.शेती पडीक सदृश्य झाली.परंतू सदरील बोगस तणनाशक औषधी विक्रेता व निर्माती कंपनीस कोणतेही सोयर सुतक नाही. अशा बोगस औषधी विक्रीतून तालुक्यातील अनेक वेळा असंख्य शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. सध्या सोनपेठ तालुक्यात बोगस औषधी व खतांची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू आहे याकडे संबंधित कृषी अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष देण्याची गरज निर्माण



झाली आहे. अशाच प्रकारचे अनेक वेगवेगळ्या कंपनीचे बोगस औषध सध्या शहरातील विविध कृषी केंद्रावर उपलब्ध झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी संबंधित कृषी अधिकारी यांनी याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

या प्रकरणी संबंधित शेतकरी बाबासाहेब गर्जे यांनी संबंधित तननाशक निर्माती कंपनी आणि विक्रेता श्री धनलक्ष्मी कृषी सेवा केंद्र यांच्या विरोधात ग्राहक न्यायालयात लवकरच दाद मागणार असल्याचे सांगितले आहे.



परभणी- जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या जितुर येथे आयोजित एका कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मिर्जा बेग व प्रथम चव्हाण यांनी त्यांचा सत्कार केला व सदिच्छा भेट घेतली.

## आषाढी एकादशीनिमित्त विश्वभारती विद्यालयात अवतरली पंढरी

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** शहरातील विश्वभारती प्राथमिक विद्यालयामध्ये आषाढी एकादशीनिमित्त शनिवार रोजी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. टाळ-मृदुंगाचा गजर आणि विठ्ठलनामाच्या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे प्राचार्य पप्पु पवार यांच्या हस्ते भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

कार्यक्रम प्रसंगी शाळेतील वरिष्ठ शिक्षिका सौ. श्रेया येवतेकर यांनी शाळेस विठ्ठल-रुक्मिणी ची मूर्ती भेट दिली असता शाळे तर्फे त्यांचे आभार मानण्यात आले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी विठ्ठलनामाचे स्मरण करत वातावरण अधिकच भक्तिमय बनवले. विद्यार्थ्यांनी साकारलेले रिंगण आणि भारूड, फ ुगडी आणि विद्यार्थ्यांनी परिधान केलेली पारंपरिक वारकरी वेशभूषा हे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. काही लहान विद्यार्थ्यांनी साक्षात श्री विठ्ठल व रुक्मिणीचे रूप धारण केले होते, जे सर्वांचे विशेष आकर्षण ठरले.शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी:टाळ-मृदुंगाच्या गजरात भव्य दिंडी काढली. वारकरी परंपरेचे मुख्य आकर्षण असलेले रिंगण अत्यंत शिस्तबद्धपणे साकारले. फुगड्या, पारंपरिक नृत्य, भारूड आणि अभंग सादरीकरणातून आषाढी एकादशीचे सामाजिक व धार्मिक महत्त्व पटवून दिले. पालकांकडून कौतुकाचा वर्षाव, विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, संस्कार आणि महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेबद्दल अभिमान निर्माण करणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थित पालकांनी मनापासून कौतुक केले. विश्वभारती प्राथमिक विद्यालय आयोजित केलेल्या या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.




## साहित्य हे समाजजीवनावरचे भाष्य असते : प्रा. डॉ. कदम




**सेलू,/प्रतिनिधी:-** स्वामी रामानंद तीर्थ हिंदी-मराठी ग्रंथालय, सेलू यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या एक दिवस एक पुस्तक या उपक्रमाच्या ४२ व्या पुष्पांतर्गत ज्येष्ठ कादंबरीकार बा. बा. कोटंबे लिखित ऊन सावलीच्या शोधात या कादंबरीवर गुरुवार, २३ जुलै २०२६ रोजी ग्रंथचर्चेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्तात्रय माकोडे हे होते, तर कादंबरीकार बा. बा. कोटंबे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. चर्चासत्राचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सखाराम कदम (प्राध्यापक, मराठी विभाग, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी) यांनी कादंबरीचे सखोल रसग्रहण करताना ''साहित्य हे समाजजीवनावरचे भाष्य असते. समाजातील वास्तव, मानवी भावभावना, संघर्ष, नातेसंबंध आणि बदलत्या मूल्यांचे प्रतिबिंब साहित्यामधून प्रभावीपणे उमटत असते,'' असे प्रतिपादन केले. ऊन सावलीच्या शोधात या कादंबरीतील आशय, पात्रांची जडणघडण, कथानकाची मांडणी, सामाजिक संदर्भ आणि लेखकाची जीवनदृष्टी यांचे त्यांनी अभ्यासपूर्ण विश्लेषण केले. साहित्य केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते समाजाला विचारप्रवृत्त करणारे आणि संवेदनशील बनविणारे प्रभावी माध्यम असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी कादंबरीकार बा. बा. कोटंबे यांनी आपल्या लेखनप्रवासातील अनुभव कथन करताना कादंबरीच्या निर्मितीमागील प्रेरणा आणि सामाजिक जाणीव याविषयी उपस्थितांशी संवाद साधला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम आवटे यांनी केले तर आभार अमोल बिडवे यांनी मानले. कार्यक्रमास शहरातील साहित्यप्रेमी, वाचक आणि ग्रंथालयाचे पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बाल वारकऱ्यांच्या भक्तिमय कला आविष्काराने साई नाट्यगृह दुमदुमले

**विठू माझा लेकुरवाळा कार्यक्रमात २२० बालकलाकारांचा लोभस सहभाग; श्रोते मंत्रमुग्ध**

**विलास मोरे**

**सेलू,/प्रतिनिधी:-** येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचालित बाहेती बिहाणी नूतन इंग्लिश स्कूलच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त आयोजित विठू माझा लेकुरवाळा हा बालगोपालांच्या कलागुणांना वाव देणारा भक्तिमय कला आविष्कार शनिवारी (दि. २५) शहरातील साई नाट्यगृहात उत्स्फ ूर्त प्रतिसादात संपन्न झाला.

तीन तास रंगलेल्या या कार्यक्रमात २२० बालकलाकारांनी संत परंपरा, आषाढी वारीचा इतिहास आणि भक्तीचा संदेश प्रभावीपणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य नंदकिशोर बाहेती व दत्तराव पावडे, शालेय समितीचे अध्यक्ष सिताराम मंत्री, उपनगराध्यक्ष साईराज बोराडे, शिक्षण व क्रीडा सभापती मिलिंद पवार तसेच पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष उत्तम लोखंडे उपस्थित होते. ज्ञानोबा माऊली तुकारामच्या गजरात बाल वारकऱ्यांच्या दिंडीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, भक्त पुंडलिक, सावता माळी, गोरा कुंभार, कान्होपात्रा आणि संत तुकाराम यांच्या जीवनकार्यावर आधारित नाट्यरूप सादरीकरणाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

शेवटी आज सोनियाचा दिनू, बरसे आनंदाचा घनू या गीताने कार्यक्रमाची भावपूर्ण सांगता झाली. प्रास्ताविक भूषण देऊळगावकर यांनी केले. सूत्रसंचालन मुक्ताई बोधले, देवांशी टिळकीकर, गायत्री जाधव, शर्वरी मोरे, कृतीका कट्ट्यारमल, आराध्या लंगडे आणि मनस्वी दिग्रसकर या विद्यार्थीनींनी केले, तर आभार प्रदर्शन शरद गोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक नरेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सीमा सोनपावले, रेखा पद्मावत, पूजा दिग्रसकर, ऐश्वर्या जैन तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तोष्णीवाल यांचा मुरुमखेडा येथे नागरी सत्कार

**जिंतूर,/प्रतिनिधी-:** तालुक्यातील मुरुमखेडा (येलदरी) येथील रहिवासी तथा महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेच्या प्रदेशाध्यक्षपदी नुकच निवड झालेले श्री. ब्रिजगोपाल रामनारायणजी तोष्णीवाल यांचा आज शनिवार दिनांक २५ रोजी समस्त ग्रामस्थ, व्यापारी व नागरिकांच्या वतीने अत्यंत उत्साहात भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

नुकतीच त्यांची या महत्त्वाच्या पदावर निवड झाल्यामुळे मुरुमखेडा व येलदरी परिसरात आनंदाचे वातावरण असून, आजच्या



सत्कार सोहळ्यास परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन श्री. तोष्णीवाल यांचा गौरव केला आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना श्री. ब्रिजगोपाल रामनारायणजी तोष्णीवाल यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, ''ज्या उच्च पदावर माझी मतदानाच्या माध्यमातून निवड झाली आहे, त्या पदाला पूर्ण न्याय देण्याचे काम भविष्यात माझ्याकडून केले जाईल. माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे व सर्वसामान्यांचे काम मी प्रामाणिकपणे करेन.'' त्यांच्या या आश्वासक भूमिकेमुळे उपस्थितांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

या सत्कार सोहळ्यास सावंगी म्हाळसा येथील प्रमोदभाऊ चव्हाण, विजयराव वाकळे, संजयभाऊ भुतडा, भगवानराव महाळणर, नारायणबाबा राठोड,वसंतराव चव्हाण, शामराव माकोडे, वैजनाथप्पा एकसिंगे, अशोक मगर, प्रमोद माकोडे, सुनील घुगे, अनंत माकोडे, सीनया टिप्पेनलु, घनश्याम भुतडा प्रवीण मुळी, दत्ता नवले यांच्यासह मोठ्या संख्येने व्यापारी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सुनील घुगे व उपस्थितांच्या सहकार्याने पार पडले.

# हिंगोलीत सकल हिंदू समाजाच्या वतीने गो सन्मान रॅली

## जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती, पंतप्रधानांना दिले निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जुलै**

गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा आणि देशातून गोवधाचे कलंक मिटावे यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंगोलीत येत्या २७ जुलै रोजी सोमवारी भव्य 'गो सन्मान महा रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे. 'गौ सन्मान आवाहन अभियान' अंतर्गत होणारी ही रॅली सकाळी १० वाजता बद्रीनारायण मंदिर गांधी चौक येथून प्रारंभ झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचणार आहे. यावेळी सकल हिंदू समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती व पंतप्रधान यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.

या गो सन्मान रॅलीमध्ये जिल्ह्यातून साधूसंतांसह सकल हिंदू संघटना तसेच नागरिक सहभागी झाले होते. निवेदनात ज्या गोमातेने आपल्याला आयुष्यभर काही ना काही दिले आहे, आज तिच्यासाठी उभे राहण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या दिव्य कार्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन गोमातेप्रती असले प्रेम व्यक्त करावे असे आवाहन करण्यात आले आहे. या रॅलीच्या माध्यमातून गोमातेला राष्ट्रमाता म्हणून घोषित करावे, गोसेवेला प्रोत्साहन द्यावे आणि गोवध थांबवावा या मागण्या प्रशासनाकडे मांडल्या जाणार आहेत.

'यही समय है दर्शक नहीं सहभागी बने' असा नारा देत गोमातेच्या प्राणांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने वेळ काढावा असे आवाहनही करण्यात आले आहे. रॅलीमध्ये 'गोमाता की जय', 'गोमाता राष्ट्रमाता' आणि 'गो सेवा देश सेवा' अशा घोषणा देत मोठ्या संख्येने नागरिक, महिला आणि युवा वर्ग भगवे झेंडे घेऊन सहभागी झाले होते. ही रॅली बद्रीनारायण मंदिर गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली या मार्गावरून काढण्यात आली. या रॅलीचे आयोजन सकल हिंदू समाज, हिंगोली यांच्यावतीने करण्यात आले होते. रॅलीच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या रॅलीत प्रकाशचंद सोनी, तेजकुमार झांझरी, शाम खंडेलवाल यांच्यासह विविध हिंदूवादी संघटना, महिला, पुरूष सहभागी झाले होते.

# प.पू. अक्षय सागरजी महाराज यांच्या आगमनानिमित्त शिरड येथे मिरवणूक



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २७ जुलै**

औंढा तालुक्यातील श्री १००८ मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर अतिशय क्षेत्र शिरड शहापूर येथे चातुर्मास अनुषंगाने परमपूज्य १०८ श्री अक्षय सागरजी महाराज, मुनी उपशम सागरजी महाराज ससंघ यांचे दिनांक २६ जुलै रोजी दुपारी साडेतीन वाजता आगमन झाले त्यांच्या मंगल प्रवेशा निमित्त मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष तेजकुमार झांजरी सह सकल दिगंबर जैन समाज बांधवांच्या वतीने त्यांचे ढोल ताशाच्या गजरात फटाक्याची आतिषबाजी करत भव्य स्वागत करण्यात आले यानंतर गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

तत्पूर्वी मिरवणूक मार्गावर आकर्षक रांगोळ्या रेखाटण्यात आल्या होत्या यानंतर मुनिश्री १०८ अक्षय सागरजी महाराज, मुनिश्री १०८ उपशम सागरजी महाराज ससंघ यांचे आगमन होताच ढोल ताशाच्या गजरात फटाक्याची आतिषबाजी करत त्याचे स्वागत केले व बसस्थानक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक,बाजार गल्ली, मराठा गल्ली मार्गे भव्य मिरवणूक काढून दिगंबर जैन मंदिर येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.यावेळी मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष तेजकुमार झांजरी, राजकुमार झांजरी, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मिलिंद, कैलास मुकीरवार, शिवकुमार कंदी, यशवंत रावळे, अमरचंद महाजन, गजेंद्र मुकीरवार, पिंटू झांजरी, लल्ला झांजरी, नवलेश कंदी, गजानन स्वामी सह मान्यवरांची उपस्थिती होती. मिरवणुकी दरम्यान पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे, पोलीस उपनिरीक्षक यशवंत गुरूपवार, बंडू घुगे, शंकर भिसे, खली राठोड, माणिक वाळले, ज्ञानेश्वर सावळे, शेरखान पठाण यांनी बंदोबस्त ठेवला होता.

# अंमली पदार्थ, महिला सुरक्षा जनजागृतीबाबत पोलिस विभागाची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जुलै**



शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींसाठी पोलिस विभागाच्यावतीने दि २७ जुलै रोजी अंमली पदार्थ, महिला सुरक्षा, सायबर सुरक्षा तसेच वाहतुक सुरक्षा बाबत जनजागृती करण्यासाठी पोलिस अधीक्षकांच्या उपस्थितीमध्ये शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयातील मुख्याध्यापक व प्राचार्य यांची बैठक घेतली.

अल्पवयीन मुले-मुली सध्या अंमली पदार्थ तसेच इतर वाईट गोष्टींना बळी पडत असून त्यांच्यामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधण्यासाठी मुलांमुलींमध्ये जनजागृती करण्यासाठी येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा यांच्या अध्यक्षतेखाली सर्व मुख्याध्यापकांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी पोलिस अधीक्षक लोढा यांनी शाळेतील मुलामुलींमध्ये जनजागृती करण्यासाठी शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी नियोजन केले तसेच मुख्याध्यापकांच्या अडीअडचणी आणि समस्या जाणून घेवून त्यावर करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहीती दिली. अंमली पदार्थ, सायबर सुरक्षा, महिला सुरक्षा आणि वाहतुक सुरक्षा बाबत शाळांनी घ्यावयाची काळजी याबाबतही मार्गदर्शन केले आहे. तसेच विद्यार्थ्यांना संपर्क साधण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयात पोलिसांचे पथक आता जनजागृती करण्यासाठी लवकरच विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.



**हिंगोली- येथील नगर पालिकेच्या विविध विभागात सोमवारी कार्यालयीन वेळेमध्ये अनेक विभागातील अधिकारी व कर्मचारी नसल्यामुळे कार्यालयात शुकशुकाट दिसत असून कार्यालयात अधिकारी, कर्मचारी सापडत नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना चकरा माराव्या लागत आहेत. मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांची बदली झाल्यापासून नगर पालिकेच्या कारभार ढेपाळला आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



हिंगोली- नटराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था हिंगोली यांच्या वतीने भव्य राज्यस्तरीय नृत्य स्पर्धा २०२६ शहरातील शिवाजीराव देशमुख सभागृह येथे २६ जुलै रोजी दुपारी दोन वाजता करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यातील विविध भागातील सामुहीक व वैयक्तिक स्पर्धेत अनेक कलाकारांनी सहभाग घेतला. मान्यवरांच्या हस्ते नृत्य स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष जगजीत राज खुराना, सुरेश अप्पा सराफ, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सतीश पाचपुते, डॉ अमोल धुमाळ, डॉ रमेश शिंदे, अॅड सुनील भुक्तार, शेख नौमान, जुबेर मामू, वाघतकर, प्रा. डॉ. किशोर इंगोले, मिलिंद उबाळे, निरज देशमुख, हारूण पठाण, सुमित चौधरी, विशाल इंगोले, अॅड. हर्ष बनसोडे, माजी नगरसेवीका आशाताई उबाळे, विद्या पवार, ज्योती वाघमारे, गणेश काकडे, त्रीशाला मिलिंद उबाळे, स्पर्शिका उबाळे, सय्यद मुजफ्फर, रवी पाईकराव यांच्या सह इतरांची उपस्थिती होती.

### अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाई देण्याची मागणी



हिंगोली- कळमनुरी तालुक्यातील येलकी शिवारात सन २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे शेत जमीन खरडून गेल्या होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. शासनाने संबंधित यंत्रणांना नुकसानीची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. परंतु अहवाल सादर करणारे कृषी सहायक यांना शेतकऱ्यांनी विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहेत. परिणामी शेतकरी बराच कालावधी उलटूनही या नुकसान भरपाई पासून वंचीत आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर भरत देशमुख, दादाराव चौतमल, संतोष पतंगे, सुभाष चौतमल, शेख सिराज, रामेश्वर शिंदे, तेहसीन बेगम, कुंडलीक किशनराव, शेख अहमद, ज्ञानेश्वर अंभोरे, प्रताप चौतमल, शेख मुनीर, आंबादास नरवाडे, वैभव पतंगे, किरण पतंगे, दत्ता पेडतकर, राहुल पतंगे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# धूळ वाटेवरचे दिवस कथासंग्रहाचे व पुरेसे हे अपूरेपण काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जुलै**




साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. साहित्यिकांनी सामाजिक वास्तवाचे भान ठेवून आपल्या लेखणीतून वैचारिक क्रांती घडवून आणावी, असा एकमुखी संदेश महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिकांनी गोडाती बबनराव काळे लिखित 'धूळवाटेवरचे दिवस' या कथासंग्रहाच्या आणि डॉ. राधिका माणिक देशमुख लिखित 'पुरेसे हे अपुरेपण' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात दिला.

मराठवाडा साहित्य परिषद शाखा, हिंगोली, थवा प्रकाशन, हिंगोली आणि क्रांतिकारी शहीद भगतसिंग श्रमिक फाउंडेशन, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने थवा प्रकाशनाच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा प्रकाशन सोहळा सराफ बँक्वेट हॉल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि वाचकांच्या प्रचंड उपस्थितीने सभागृह खचाखच भरले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापुरकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक मा. प्रा. डॉ. पी. विठ्ठल, सुप्रसिद्ध साहित्यिक व जागरणकार भारत सातपुते, सुप्रसिद्ध कथाकार राजेंद्र गहाळ तसेच ज्येष्ठ कवी प्रा. विलास वैद्य यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

अध्यक्षीय भाषणात अशोक अर्धापुरकर यांनी साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब आहे. त्यामुळे साहित्यिकांनी आपल्या लेखणीतून सामाजिक वास्तव, मानवी मूल्ये आणि परिवर्तनाची जाणीव जपणारे साहित्य निर्माण केले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

प्रा. डॉ. पी. विठ्ठल यांनी साहित्यिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यापेक्षा आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजात वैचारिक क्रांती घडवून आणावी. विचारांना दिशा देणारी लेखणी हेच परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे प्रभावी मत व्यक्त केले. सुप्रसिद्ध साहित्यिक भारत सातपुते यांनी साहित्यिकांनी आपल्या चरित्रातून समाजाला आदर्श आणि दिशा दिली पाहिजे, असे सांगत साहित्यिकांच्या वैयक्तिक आचरणाचे महत्त्व अधोरेखित केले. ज्येष्ठ कवी प्रा. विलास वैद्य यांनी कविता ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती जीवनाची साधना आहे, असे सांगत साहित्यनिर्मिती ही संवेदनशीलतेची आणि आत्मसाधनेची प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी 'धूळवाटेवरचे दिवस' या कथासंग्रहाचेतसेच 'पुरेसे हे अपुरेपण या कविता संग्रहाचे विशेष कौतुक केले. ग्रामीण समाजजीवनातील वास्तव, सामान्य माणसाचे भावविश्व, संघर्ष, सामाजिक विषमता, नातेसंबंध आणि बदलत्या जीवनमूल्यांचे प्रभावी चित्रण या कथांमधून उभे राहिल्याचे त्यांनी नमूद केले. वास्तववादी आशय, प्रवाही भाषा आणि सामाजिक भान यांमुळे हा कथासंग्रह मराठी साहित्यविश्वात निश्चितच वेगळी ओळख निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच 'पुरेसे हे अपुरेपण' या कवितासंग्रहातील संवेदनशीलता, भावविश्व आणि आशयघन अभिव्यक्तीचेही त्यांनी कौतुक केले.

साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेवर भाष्य करताना मान्यवरांनी समाजातील घडामोडींचे डोळस निरीक्षण, मानवी जीवनातील सुख-दुःख, संघर्ष आणि बदल यांचे प्रामाणिक चित्रण यांतूनच दर्जेदार साहित्य जन्माला येते, असे सांगितले. साहित्य हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम असल्याने प्रत्येक साहित्यिकाने सामाजिक बांधिलकी जपत आपल्या लेखणीतून परिवर्तनाची वाट चालावी, असा संदेशही त्यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश येवले यांनी प्रभावीपणे केले. पारिजात देशमुख यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली, तर रसिका विडोळकर यांनी थवा प्रकाशनाच्या वर्षभरातील साहित्यिक वाटचालीचा आढावा घेत मनोगत व्यक्त केले. डॉ. गायत्री दरगू यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बाबुराव गाडे, रतन आडे, प्रा. राजाराम बरस्कर, स्नेहल देशमुख, अश्विनी देशमुख, संगीता चौधरी, गौरी गुंडेवार, गणेश सावळे, मेघराज थोरे, विजय ठाकरे, मनोहर दिपके, शिवाजी पंडित आदींनी विशेष परिश्रम घेतले. या प्रकाशन सोहळ्यास हिंगोली शहरासह जिल्हाभरातील साहित्यप्रेमी, कवी, लेखक, वाचक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दोन्ही साहित्यकृतींना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# हिंगोलीतील जीवन कला मंदिरात गुरूपोर्णिमा उत्सवाला सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जुलै**



जीवन कला मंदिर, गवळीपूरा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही गुरुपौर्णिमा उत्सवाला आजपासून प्रारंभ झाला. २७ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत हा तीन दिवसीय उत्सव साजरा होणार आहे.

उत्सवाच्या पहिल्या दिवशी २७ जुलैला सोमवारी सकाळी श्रींच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला. परमपूज्य डॉक्टर विष्णु महाराज पारनेरकर यांच्या जन्मतिथी निमित्त हा अभिषेक पूजा विधी श्रीकांत सुधाकरराव जोशी व सौ. जयश्री श्रीकांत जोशी यांच्या हस्ते संपन्न झाला. याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता परमपूज्य श्री. विष्णु महाराज पारनेरकर यांच्या जन्मदिना निमित्त श्री ग्रंथाचे वाचन आणि दीपोत्सवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आज २८ जुलै मंगळवारी सकाळी श्रींच्या मूर्तीस अभिषेक श्री व सौ विष्णू राजेश देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी ९.३० ते १.३० या वेळेत परमपूज्य श्री रामचंद्र महाराज यांचे ओवीबद्ध चरित्र पारायण होईल. सायंकाळी ७.३० वाजता श्री गजानन रत्नपारखी यांचे अभिनव अभंग गायन होणार आहे.

उत्सवाचा मुख्य दिवस २९ जुलै बुधवार असून या दिवशी सकाळी ८ वाजता श्रींच्या मूर्तीला अभिषेक होईल. याचे यजमानपद श्री व सौ. नाना बांगर भूषवतील. सकाळी १०.३० वाजता नांदेडचे संजय नर्सीकर यांचे प्रवचन होईल. त्यानंतर आरती व तीर्थप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. हा सर्व कार्यक्रम जीवन कला मंदिर, गवळीपूरा येथे होत आहे. मंदिराच्या वतीने पूर्णवादी परिवारातील सर्व गुरुबंधू आणि भगिनींनी या धार्मिक सोहळ्यात उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थीनींसाठी सत्संगाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ जुलै**



आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने शिवाजी कॉलेज येथे आर्ट ऑफ लिव्हिंग हिंगोली संस्थेच्या वतीने कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विद्यार्थिनींसाठी विशेष सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये २०० विद्यार्थिनींना आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. भजन, नामस्मरण, प्रार्थना, प्रेरणादायी विचार तसेच विविध आनंददायी उपक्रमांद्वारे विद्यार्थिनींमध्ये सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि भारतीय संस्कृतीविषयीची जाणीव जागृत करण्यात आली. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाचा आनंद लुटला.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्यामकांत पजई, सुनीता पजई, मोतिरामजी इंगोले, महेश सरनाईक, निलेश अग्रवाल, ज्योती पोपते, मेघा, मनिषा, प्रियंका, प्रतिभा पवार, प्रणव देशमुख, अभिजीत अवघढ, अमन पजई, शशी चौधरी, अंकुश डहाले, मीनाक्षी शाहने यांनी विशेष सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक प्रार्थना, आभार प्रदर्शन आणि सर्वांच्या मंगलकामनांनी करण्यात आले.

# कालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम
# शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना घातला घेराव

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २७ जुलै -**

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाअंतर्गत तिरकसवाडी उजवा मुख्य कालव्यावरील सब मायनर क्रमांक १ कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून कालव्यालगत मुरूम मजबुती करणाचे कामही थातूरमातूर करण्यात आले असल्याची तक्रार कार्यकारी अभियंता खेडकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली असून शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांना घेराव घालत जवाब विचारत धारेवर धरले असून गुण नियंत्रण पथकामार्फत सखोल तपासणी करून कंत्राटदार भ्रष्ट अधिकारी यांच्यावर कठोर कार्यवाही करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे .



उर्ध्व पैनगंगा सब मायनर क्रमांक एक वरील ३.८ किलोमीटर लांबीचे अंतर असलेल्या कॉंक्रीट अस्तरीकरण तसेच कालवा लगत रस्त्याच्या मुरूम मजबुतीकरणाच्या कामासाठी शासनाने ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे . परंतु या कालव्याचे नुकतेच करण्यात आलेल्या कॉंक्रीट अस्तरीकरण निकृष्ट दर्जाच्या कामामुळे तडे गेले असून कालव्यालगत रस्त्यासाठी माती मिश्रित मुरूम वापरल्याने चिखलात वाहने फसत असून या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप स्थानिक शेतकऱ्यांनी लेखी निवेदनाद्वारे केला आहे . यासंदर्भात पाठबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता एस. बी .खेडकर विभाग क्रमांक आठ यांच्याकडे दि.२४ जुलै रोजी रीतसर तक्रार अर्ज दाखल केला आहे . कॉंक्रीट अस्तरीकरण कामात जाडी ७.५ सेंटीमीटर असणे आवश्यक असताना कंत्राटदारांनी फक्त ३-४ सेंटीमीटर जाडीतच काम उरकले आहे . याशिवाय कालव्याच्या आतील बाजूस कमी मुरूम वापरण्यात आला असून पाणी टाकून योग्य दबई न करताच अस्तरीकरण करण्यात आले आहे . त्यामुळे या कालव्यास अनेक ठिकाणी भेगा पडल्या असून हाताने सिमेंटचे पापडे निघत आहे . ही गंभीर बाब शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंताच्या निदर्शनास आणून दिली आहे.

निविदामध्ये सबमायनर लगत रस्त्याच्या मुरूम मजबुतीकरणाच्या कामाचाही यामध्ये समावेश आहे . परंतु कंत्राटदारांनी रस्त्यावर माती मिश्रित मुरूम लाल माती टाकल्याने रस्ता चिखलात रुतला असल्याचे निवेदनात नमूद केले आहे . याबाबत कनिष्ठ अभियंता यांना वारंवार सांगूनही अरे रावीची भाषा केल्याचा शेतकऱ्यांनी तक्रारीत आरोप केला आहे . निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत कार्यकारी अभियंता यांना घेराव घालून जवाब विचारत धारेवर धरले आहे . या कामाची सखोल चौकशी करण्यात येण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर शेतकऱ्यांचा राग शांत झाला . कालव्याच्या कामाची गुणवत्ता नियंत्रण पथकामार्फत स्थानिक शेतकऱ्यांच्या समक्ष तपासणी करण्यात यावी दर्जेदार काम पूर्ण होईपर्यंत कंत्राटदारांची बिले काढण्यात येऊ नये . तसेच दोषी आढळल्यास कंत्राटदारावर तात्काळ कारवाई करून काळ्या यादीत टाकण्यात यावे . संबंधित विभागाने कालव्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाच्या तक्रारीची दखल न घेतल्यास तीव्र जन आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी तक्रारीद्वारे केला आहे . या निवेदनावर शिवाजी देशमुख , अमोल लोमटे , परमेश्वर उपवार,रामेश्वर उपवार, मोहित महाजन , सचिन बने,बालाजी निलेवार , रामेश्वर उपवार, बाळू आठवले , विश्वनाथ मुलगे, विनोद मुगटकर, योगेश धुडकेवार , रमेश पानबुडे यांच्यासह असंख्य शेतकऱ्यांच्या यावर स्वाक्षऱ्या आहेत.

**शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने घेतली मुख्य अभियंता अरुण नाईक यांची भेट**

शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्य अभियंता अरुण नाईक यांची भेट घेऊन कालव्याच्या निकृष्ट दर्जाच्या पुराव्यासह कामाचा भांडाफोड केला . यानंतर शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाला या कामाची सखोल चौकशी करून योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले . कार्यकारी अभियंता एस.बी.खेडकर यांना तातडीने बोलावून घेऊन या कामाबाबत विचारणा केली . त्यानंतर निकृष्ट कामाबाबत नाराजी व्यक्त करीत खडे बोल सुनावले. संबंधित अधिकाऱ्यांनी आठ दिवसात दर्जेदार काम करून देण्याचे आश्वासन संतप्त शेतकऱ्यांच्या शिष्ट मंडळाला दिले आहे .

# आ. कोहळीकर यांच्या पुढाकाराने मोफत सर्वरोग निदान शिबिरास नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २७ जुलै -**

ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत उत्तम आरोग्य सुविधा पोहोचवण्याच्या उद्देशाने आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या संकल्पनेतून व विशेष पुढाकाराने कोहळी (ता. हदगाव) येथे नुकतेच एका मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



६६८ रुग्णांची तपासणी, २१८ रुग्ण पुढील उपचारांसाठी वर्गकरण्यात आले

या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये एकूण ६६८ रुग्णांची ओपीडी तपासणी यशस्वीरीत्या पार पडली. या तपासणीदरम्यान पुढील विशेष उपचारांची गरज असलेल्या २१८ रुग्णांची निवड करण्यात आली असून त्यांना पुढील उपचारांसाठी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे), वर्धा येथे मोफत उपचारासाठी पाठविण्यात येणार आहे.या आरोग्य शिबिराचे उद्घाटन व उपस्थिती सोहळा विशेष मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यामध्ये महादेव मठ संस्थान हदगावचे श्री. ष. ब्र. १०८ शिवचैतन्य शिवाचार्य महाराज, हदगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मुरमुरे, आणि निर्मल हॉस्पिटलचे संचालक डॉ. स्वप्निल आढाव यांनी प्रमुख उपस्थिती लावून मार्गदर्शन केले व उपक्रमाचे कौतुक केले.हे महाआरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी दत्ता मेघे हॉस्पिटलच्या संपूर्ण वैद्यकीय पथकाने विशेष परिश्रम घेतले. तसेच तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, सर्व आशा सेविका आणि शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून व्यवस्थापनात मोलाचे सहकार्य केले.नागरिकांकडून कृतज्ञता व्यक्त होत असून अशा उपक्रमामुळे परिसरातील शेकडो गरीब व सामान्य नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेता आला. आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या या जनहितकारी आणि लोकउपयोगी उपक्रमाबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत त्यांचे मनापासून आभार मानले आहेत.

# सोमेश्वर येथे मातोश्री बायनाबाई नामदेवराव बोकारे यांच्या स्मरणार्थ कीर्तन सोहळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ जुलै -**

ह.भ.प. वारकरी परंपरेच्या पाईक, वैकुंठवासी मातोश्री बायनाबाई नामदेवराव बोकारे यांच्या पावन स्मरणार्थ सोमवार, दि. २८ जुलै रोजी सोमेश्वर (ता. नांदेड) येथे सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. ड. श्री यादव महाराज डाखोरे (वाईकर) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

वारकरी संप्रदायाचा समृद्ध वारसा लाभलेल्या मातोश्री बायनाबाई नामदेवराव बोकारे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या तेराव्या दिवसानिमित्त हा कीर्तन सोहळा सकाळी ११.०० वाजता, सोमेश्वर (राहाटी) येथील हनुमान मंदिर परिसरात संपन्न होणार आहे.

या कीर्तन सोहळ्यास भाविकांनी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मातोश्रींना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन तानाजी नामदेवराव बोकारे, देविदास नामदेवराव बोकारे, पंढरीनाथ नामदेवराव बोकारे (ज्येष्ठ पत्रकार) आणि प्रा. दत्ता नामदेवराव बोकारे यांनी केले आहे.

## चिमुकल्या वारकऱ्यांच्या वृक्षदिंडीतुन घडविले सांस्कृतीचे दर्शन

**नवीन नांदेड** -सिडको येथील कुसुमताई विद्यालयातील चिमुकल्यांनी आषाढी एकादशी निमित्त विठुरायाची पालखी सोबत वृक्षदिंडी काढून सिडकोतील भावी भक्तांना विठ्ठल रुक्मिणीचे आगळे वेगळ्या दर्शनातून



घडविले संस्कृतीचे दर्शन. सिडको परिसरात नावलौकिक असलेल्या कुसुमताई महाविद्यालय येथे महाराष्ट्रातील विविध पारंपारिक संस्कृतीचे दर्शन घडवणारे व प्रत्येक सण उत्सवाच्या निमित्ताने त्या त्या उत्सवाचे प्रासंगिक प्रदर्शनाचे सादरीकरण करून आपली संस्कृती जपण्याचे प्रात्यक्षिक नागरिकासमोर सादर करत असतात. यातलाच एक भाग म्हणून दिनांक २५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरच्या विठुरायाची पालखी व वृक्ष दिंडीचे दर्शन कुसुमताई विद्यालयातील चिमुकल्याणी घडवून आणले. या वेळी यापालखीचे विधीवत पूजन संस्थेचे सचिव संभाजी बिरादार व मुख्याध्यापिका शशिकलाताई जाधव यांनी करून विठ्ठल नामाच्या जयघोषात या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सदरील पालखीच्या सादरीकरणात माधुरी माखणे, वंदना सोनसळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## उमरी नगरपरिषदे कडून दोन दिवसीय एस आय आर कॅम्प

**उमरी** -शहरातील मतदार नागरीकांसाठी एसआय आर पुनरिक्षण नोंदणीसाठी उमरी नगर परिषदे कडून दोन दिवसीय कॅम्प ठेवण्यात आले आसून ज्या नागरीकांनी आतापर्यंत ई एफ फॉर्म भरला नाही आशा नागरीकांनी योग्य ती कागदपत्र घेवून उपस्थित राहावे असे आव्हाण नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे .उमरी शहरातील नागरीकांना या व्द्वारे जाहीर आव्हाण करण्यात येते की डळठ चे काम गेल्या महिणाभरा पासून युद्ध पातळीवर कामे सुरू आहेत मतदार सखोल पुनरिक्षण काम करण्याकरीता उमरी शहरातील एकूण १३ मतदार केंद्रस्तरीय अधिकारीसह सहाय्यक कर्मचारी यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे .त्या अनुषंगाने कै गिरीषभाऊ गोरठेकर सांस्कृतीक सभागृह येथे दि . २८ जुलै २०२६ ते २९ जुलै २०२६ रोजी सकाळी ८:०० वाजता ते सांयकाळी ६: ०० वाजेपर्यंत या दोन दिवसीय कालावधीत ज्या नागरीकांनी फॉर्म भरला नाही त्यानी आवश्यक ते कागदपत्रे घेवून उपस्थित राहावे असे जाहीर आव्हाण ही मुख्यधिकारी नगर परिषद उमरी यांनी केले आहे .

## पृथ्वीराज तौर यांच्या 'चल रे भोपळ्या' चा आंतरराष्ट्रीय बालनाट्य महोत्सवात प्रयोग

**नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. पृथ्वीराज तौर यांनी पुनर्रचित केलेल्या 'चल रे भोपळ्या टुणुक टुणुक' या पारंपरिक लोककथेच्या नाट्यरूपांतराचा प्रयोग हैदराबाद येथे आयोजित दुसऱ्या आंतरराष्ट्रीय बालनाट्य महोत्सवात 'रंगधारा'च्यावतीने सादर करण्यात आला. देशविदेशातील विविध बालनाट्यांसमवेत 'चल रे भोपळ्या'च्या मराठी भाषेतील प्रयोगाने हैदराबादकरांची मने जिंकली. अप्रतिम प्रयोग अशा शब्दात गौरव करत प्रेक्षकांनी बालकलावंतांचे कौतुक केले. हैदराबाद येथे दिनांक २० ते २४ जुलै २०२६ च्या दरम्यान दुसऱ्या आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'रवींद्रभारती'मध्ये हा प्रयोग सादर करण्यात आला. ज्येष्ठ रंगकर्मी प्रकाश फडणीस यांनी रंगधारा थिएटर स्ट्रीमच्या वतीने 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक'चे कुशल दिग्दर्शन केले. यशस्वी सादरीकरणासाठी अभिलाषा आणि अवधूत कुलकर्णी तसेच रंगधारा थिएटरच्या संपूर्ण टीमने प्रयत्न केले. 'चल रे भोपळ्या टुणुक टुणुक' आणि 'म्हातारी निघाली गाणी म्हणत' ही प्रयोगातील गीते सादर होताना प्रेक्षकही त्यात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. प्रकाशयोजना, संगीत, जंगलाचा देखावा, नेपथ्य आणि बालकलावंतांचा उत्साही अभिनय यामुळे प्रयोग उत्तरोत्तर रंगत गेला. दिग्दर्शक श्री. प्रकाश फडणीस यांनी प्रयोगाविषयी सांगितले की, या प्रयोगामुळे बालकलावंतांना आंतरराष्ट्रीय रंगमंचावर अभिनय करण्याचा अनुभव मिळाला. तसेच मराठी मातृभाषेवरील प्रभुत्वात भर पडली. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोककथा आणि सांस्कृतिक परंपरेच्या संक्रमणाचा प्रत्यय घडवणाऱ्या नाट्यप्रयोगासाठी डॉ पृथ्वीराज तौर यांचे विद्यापीठातील अधिकारी व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

# आधार प्रमाणीकरण व अग्रीस्टॅक नोंदणी तातडीने पूर्ण करा : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ जुलै -**

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ अंतर्गत सोमवार दुपारी १२ वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील २ लाख २४ हजार ८४७ शेतकऱ्यांची लाभार्थी यादी अपलोड करण्यात आली आहे. यापैकी ९९ हजार ५४ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले असून, केवळ १४ हजार शेतकऱ्यांची ई-केवायसी सोमवार दुपार १२ पर्यंत पूर्ण झाली आहे. तर ८५हजार ५४ पात्र शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी केलेली नाही.

त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण व अग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

आज जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी जिल्हयातील कर्जमुक्तीचा आढावा घेतला.

आधार प्रमाणीकरण पूर्ण करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना त्वरीत कर्जमाफीचा लाभ मिळेल, तसेच ते पुन्हा नव्याने पीक कर्ज घेण्यासही पात्र ठरतील.

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा 'सीएससी (उडउ) केंद्रावर' जाऊन आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. यावेळी लाभार्थी यादीतील नावाची खात्री करून अंगठ्याचे बायोमेट्रिक प्रमाणीकरण, मूळ आधार कार्ड आणि बचत खात्याचे पासबुक सोबत आणणे आवश्यक आहे.

जिल्हा उपनिबंधक यांनी शेतकऱ्यांना विलंब न करता आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था किंवा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने कर्जमाफीचा लाभ दिला जात असून, आधार संलग्नीकरण, आधार प्रमाणीकरण आणि अग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करणे ही लाभ मिळविण्याची अत्यावश्यक अट आहे. सदर योजनेसाठी आपले सरकार सेवा केंद्र, सी एस सी केंद्र येथे जाऊन आधार प्रमाणीकरणासाठी कोणतेही शुल्क लागू नाही. कोणत्याही आपले सरकार सेवा केंद्र चालक किंवा सी एस सी केंद्र चालकाने शुल्क आकारू नये अशीही सूचना जिल्हाधिकारी यांनी केली आहे

# शासकीय कृषी महाविद्यालय नांदेडच्या गट अ व गट ब संवर्गातील पदांना शासनाची मान्यता

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ जुलै -**

शासकीय कृषी महाविद्यालय, नांदेड येथील आस्थापनेवरील गट अ व गट ब संवर्गातील ३२ पदांना महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली असून, यामागे आमदार बालाजी कल्याणकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याचे सांगण्यात आले आहे.



शासकीय कृषी महाविद्यालय, नांदेडला महाराष्ट्र शासनाने सन २०२३ मध्ये मान्यता दिली होती. ही मान्यता मिळवण्यासाठीही आमदार बालाजी कल्याणकर यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला होता. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, सध्या महाविद्यालय पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे.

मात्र, महाविद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या पदांना शासनाची मान्यता मिळणे आवश्यक होते. यासाठी आमदार कल्याणकर यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला. त्यास यश मिळत ९६ मंजूर पदांपैकी गट अ व गट ब संवर्गातील ३२ पदांना शासनाने मान्यता दिली आहे.

उर्वरित पदांनाही लवकरात लवकर मान्यता मिळावी, यासाठी आपला पाठपुरावा सुरू असून त्यालाही लवकरच यश मिळेल, असा विश्वास आमदार बालाजी कल्याणकर यांनी व्यक्त केला.

या यशाबद्दल शासकीय कृषी महाविद्यालय, नांदेडचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. जायेवार तसेच महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आमदार बालाजी कल्याणकर यांचे आभार व्यक्त केले.

# बारडमध्ये श्री साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जय्यत तयारी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २७ जुलै -**

मुदखेड तालुक्यातील बारड येथे ग्रामस्थांच्या लोकसहभाग, श्रमदान आणि लोकवर्गणीतून उभारण्यात आलेल्या भव्य श्री साईबाबा मंदिरात गुरुपौर्णिमेच्या पावन मुहूर्तावर श्री साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडणार आहे. या निमित्ताने तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून काल्याचे कीर्तन, भजन, पूजन, हवन आणि महाप्रसादाचा लाभ भाविकांना मिळणार आहे.



बारड ग्रामपंचायतीने साई मंदिर संस्थानसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. सुमारे १०५ बाय ६० फूट क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या या मंदिरात ३ बाय ३० फूट आकाराचा प्रशस्त गाभारा बांधण्यात आला असून त्यामध्ये पाच फूट उंचीची संगमरमरी श्री साईबाबांची मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात येणार आहे. मंदिर परिसरात वृक्षारोपणासह आकर्षक बगीचाही विकसित करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या श्रमदान, लोकसहभाग आणि लोकवर्गणीतून शिर्डीच्या धर्तीवरील देखणे साई मंदिर साकार झाल्याने परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

गुरुपौर्णिमेनिमित्त बुधवार, दि. २९ जुलै रोजी सकाळी शुभमुहूर्तावर मंडळपूजन, हवन आणि सकाळी ९ वाजून ५ मिनिटांनी श्री साईबाबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत हरिभक्त परायण प्रेममूर्ती हर्षल महाराज थोरात पाटोदेकर (येवला) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, कार्यक्रमानंतर ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

या धार्मिक सोहळ्याची सुरुवात दि. २७ जुलै (सोमवार) रोजी सकाळी ९.१५ वाजता गावातील प्रमुख मार्गांवरून भव्य ग्रामप्रदक्षिणा व शोभायात्रेने होणार आहे. दि. २८ जुलै (मंगळवार) रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत पूजा मांडणी होईल. त्यानंतर ११ ते सायंकाळी ५ या वेळेत मंडळस्थापना, पूजन, हवन तसेच मूर्तीस जलदिवास, फलदिवास, धान्यदिवास, फुलदिवास आणि शयन विधी आदी धार्मिक कार्यक्रम पार पडतील.

या पवित्र सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामस्थ तसेच श्री साईकृष्ण मंदिर संस्थान विश्वस्त व्यवस्था समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मानवी वस्तीलगतच्या शेतात रानडुकरांचा हैदोस

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २७ जुलै -**

इस्लापूर येथील शेतकरी पांडुरंग विठ्ठलराव जाधव व सचिन पांडुरंग जाधव यांच्या सर्व्हे क्रमांक २४९ मधील सुमारे सहा एकर क्षेत्रातील ऊस व मका पिकावर रानडुकरांच्या कळपाने अक्षरशः हैदोस घातला आहे. सात ते आठ रानडुकरांच्या कळपाने रात्रीच्या वेळी शेतात घुसून दीड ते दोन एकरांवरील ऊस पिकाची मोठ्या प्रमाणात नासधूस केली असून, या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



विशेष म्हणजे, सदर शेती ही मानवी वस्तीलगत असल्याने रानडुकरांचा वावर आता केवळ शेतीपुरता मर्यादित राहिलेला नाही. रात्रीच्या वेळी हा कळप गावालगत मुक्तपणे फिरत असल्याने ग्रामस्थ, शेतकरी, शेतमजूर, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, नागरिकांमध्ये दहशतीचे सावट आहे.

शेतकरी पांडुरंग जाधव यांच्या माहितीनुसार, गेल्या अनेक दिवसांपासून हा कळप परिसरात ठाण मांडून आहे. दररोज रात्री ऊस व मका पिकात घुसून मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात आहे. रानडुकरांना हाकलण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांच्या अंगावर ही रानडुकरे धावून येत असल्याने शेतात जाणेही धोक्याचे बनले आहे. परिणामी, शेतकरी स्वतःचे पीक वाचवायचे की स्वतःचा जीव, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे.

याबाबत संबंधित वन विभागाला माहिती देण्यात आली असूनही अद्याप घटनास्थळी कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे वन विभागाच्या उदासीन भूमिकेबद्दल परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

शेतकरी पांडुरंग विठ्ठलराव जाधव व सचिन पांडुरंग जाधव यांनी वन विभागाकडे तातडीने नुकसानीचा पंचनामा करून शासन नियमानुसार नुकसानभरपाई द्यावी, तसेच मानवी वस्तीलगत मुक्तपणे फिरणाऱ्या रानडुकरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करून त्यांना सुरक्षित जंगल परिसरात हलविण्याची मागणी केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून इस्लापूर परिसरात वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. पिकांचे सातत्याने नुकसान होत असतानाच आता मानवी जीवितालाही धोका निर्माण झाल्याने या प्रश्नाकडे केवळ वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने नव्हे, तर मानवी सुरक्षिततेच्या दृष्टीनेही तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

**शेतकऱ्यांची आर्त हाक**

आम्ही रात्रभर जागून पीक वाचवण्याचा प्रयत्न करतो; मात्र रानडुकरे अंगावर धावून येतात. शेती मानवी वस्तीलगत असल्याने नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. वन विभागाला माहिती दिली, पण अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. एखादी जीवितहानी होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून आम्हाला दिलासा द्यावा अशी मागणी शेतकरी पांडुरंग जाधव, यांनी केली.